1-1

# History Revision

## By

# उमेश कुदळे

# 1. कामगार चळवळ

**शशिपाद बॅनर्जी :**

- ताग गिरणीतील कामगारांच्या शिक्षणासाठी, तसेच कामगारांमध्ये सामुदायिक वृतीची आणि आंदोलन करण्याची भावना विकसित होण्यासाठी त्यांनी 'बारा बझार' या संस्थेची स्थापना केली.
- 1870 – बंगालमध्ये श्रमजीवी समिती या नावाने बंगालमधील पहिली कामगार संघटना (Working Men's Club) यांनी सुरु केली.
- संघटनेचे मुखपत्र – भारत श्रमजीवी.
- पंडित शिवनाथ शास्त्री यांची श्रमजीवी नावाची कविता या वृत्तपत्रात प्रकाशित झालेली. (पहिली कामगार कविता)
- महाराष्ट्र – मजुर – मराठीतील आद्य कवी केशवसुत यांनी 1889 लिहली.

**श्री.पी.सी.मजुमदार :**

- 1872 – ब्राम्हो समाजाचे पी.सी.मजुमदार यांनी मुंबईला आठ रात्रशाळा काढल्या. (प्रार्थना समाजाकडुन भिकोबा चव्हाण यांनी 1876 मध्ये कामगारांसाठी रात्रशाळा सुरु केल्या)
- 1878 साली कलकत्ता येथे 'वर्किंग मेन्स मिशनची स्थापना केली.
- या मिशनच्या माध्यमातुन कामगारांमधील अशिक्षितपणा नष्ट करणे, स्वच्छतेची काटकसरीची सवय जोपासणे या माध्यमातुन या शाळा सुरु केल्या.

**सोराबजी शापुरजी बंगाली (1875) :**

- कामगार संघटना काढण्याचा प्रयत्न केला होता.
- यांनी कारखान्यातील कामगारांच्या दयनीय अवस्थेविरुध्द कायदेशीर उपाय करण्यासाठी कामगारांचे नेतृत्व केले.
- 1878 – लॉर्ड लिटनला पत्र पाठवुन आयात कराविषयीचे वास्तव कळविले.

**श्री जनार्दन रामचंद्रजी :**

- मुंबई विद्यापीठातील रजिस्ट्रर कार्यालयातील कामगारांचे दु:ख जवळुन पाहिले होते.
- हेडक्लार्व असलेल्या रामचंद्रजींनी मुंबई सरकारला निवेदन पाठवुन कामगारांच्या दु:खाकडे लक्ष वेधण्यास सांगितले.
- 1874 : मेजर मुर या मुंबईतील कापुस खात्याच्या मुख्य निरिक्षकाने तसेच रेव्हग्रेड या इंग्लंडमधील कारखानयाच्या निरिक्षकाने हिंदुस्थानात सरकारने कायदा करावा असे सुचविले.

**पहिले फॅक्टरी कमिशन :**

- तत्कालीन कारण – मुंबई उद्योगाच्या स्पर्धेच्या व भरभराटीच्या मँचेस्टरच्या गिरण्यंना धोका वाढु लागल्याने फॅक्टरी  ॲक्ट' लागु करावी अशी मागणी पुढे आली.
- अध्यक्ष – अबुर्थनॉट
- सहभागी गिरणीमालक – मंगलनाथ नथुभाई, दिनशॉ पेटीट, मोरारजी गोवुळदास (सर्व सदस्य बॉम्बे मिल ओनर्स असोशिएशनचे)
- बॉम्बे ओनर्स असोशिएशन – 1875 साली मुंबई सरकारद्वारा कायदा करण्याची शक्यता दिसताच या संघटनेची स्थापना केली.
- सदस्य – मंगलदास नथुभाई, दिनशॉ पेटीट, मोरारजी गोवुळदास
- तत्कालीन कारण – गिरणी कारभारात व्यर्थ हस्तक्षेप करणाऱ्या माग्ण्या धुडकावणे व गिरणी मालकांचे हीत.
- या कायद्याच्या संदर्भात रास्तगोक्तार, इंदुप्रकाश ही वृत्तपत्रे जामेजमशेद, नेटीव्ह ओपिनियनने या वृत्तपत्रांनी विरोधाची भुमिका घेतली.
- 1878 – इंग्लंडमधुन भारतात आयात होणारे जाडे भरडे कापड आणि सुत यावरील कर सरकारने काढला. याचे गांभीर्य

समजवण्यासाठी वे.टी.तेलंग, नौरोजी पुर्दृनजी, फिरोजशाहा मेहता आणि बद्रुद्दीन तय्यबजी हे गिरणी मालकांना भेटुन सभेचे आयोजन केले.

**15 मार्च 1881 :**

- गव्हर्नर जनरलच्या कायदे कौन्सिलने फॅक्टरी बील मंजुर केले. (अर्बुथ नॉट कमीशन)
- या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याची विनंती ना.मे.लोखंडे तसेच जनार्दन रामचंद्रजी सारख्या कामगार नेत्यांनी केली.

**1884 – बॉम्बे मिल हॅण्ड असोशिएशन :**

- ही देशातील पहिली कामगार संघटना होती.
- सदस्य – विविध गिरण्यांतील प्रमुख जॉबर मंडळी रघु भिकाजी, गेणु बाबाजी, नारायण सुर्कोजी, विठ्ठल कोरगावकर, कृष्णराव अर्जुन केळुस्कर, रामचंद्रराव शिंदे, नारायणराव पवार इ.
- 1884 : मुंबईचे कलेक्टर डब्लु.बी. मुलक यांच्या अध्यक्षतेखाली एक फॅक्टरी कमीशन नेमले.
- 23 सप्टेंबर 1884 – कामगारांची पहिली सभा मुंबईतील परळ येथे घेतली.
- फॅक्टरी कमिशनचे अध्यक्ष मुलक यांना कामगारांच्या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले. त्यातील प्रमुख मागण्या होत्या.
  1) गिरणी कामगारांना आठवड्यातुन एक पुर्ण दिवस रविवारी विश्रांती द्यावी.
  2) गिरणीतले काम सकाळी 6.30 ते सुर्यास्तापर्यंत असावे.
  3) दुपारच्या वेळी अर्धा तास सुटी देण्यात आली.
  4) कामगारांचा पगार पुढील महिन्याच्या 15 तारखेपर्यंत देण्यात यावा.
  5) गिरणीत काम करताना जर गंभीर दुखापत झाली, तर तो पुर्ण बरा होईपर्यंत पुर्ण पगार देण्यात यावा.

**10 जुन 1890 :**

- 10 जुन 1890 साली गिरणी मालकांनी रविवारची सुट्टीला मान्यता दिली.

**1891 :**

- नविन कामगार कायदा नेमण्यात आले – लेथब्रीज कमिशन या कमिशनमध्ये नारायण मेघाजी लोखंडे कामगारांचे सदस्य म्हणुन घेण्यात आले.
- 1 जानेवारी 1892 पासुन हा कायदा अंमलात आला.
- फॅक्टरी ॲक्ट निर्मितीसाठी लोखंडे यांनी कमिशनला सहकार्य करुन आपल्या बुध्दिमत्तेची चमक दाखवुन दिई यांच्या वैशिष्ट्यपुर्ण कार्याचा उल्लेख करताना श्री जॉर्ज कॉटन अतिशय बुध्दिमान लोखंडेचे कामगारांशी नाते किती जवळचे होते. मुले व पुरुष कामगारांविषयी त्यांना किती आस्था होती. याचा खास उल्लेख केलेला दिसतो.

**1891 (रॉयल कमिशन ऑन लेबर) (शाही कमिशन) :**

- ब्रिटिश सरकारने भावी काळातील व्यापार योजनेचा आराखडा व अहवाल सादर करण्यासाठी हे कमिशन स्थापन केले.
- ना.मे.लोखंडे या कमिशन समोर 'कामगारांची कैफियत' मांडली.

**1893 :**

- मागास कष्टकरी वर्गाचा प्रतिनिधी कायदे कौन्सिलमध्ये पाठवावा यासाठी नावे सुचवण्यात येते होती.
- यावरुन सत्यशोधक चळवळीत लोखंडे व गंगाराम भाऊ म्हस्के यांच्यात गट पडले.
- सदाशिव केळकर यांनी इंडियन टेक्स्टाईल सभेस एन.एन. वाडीया हे कामगारांचे प्रतिनिधी म्हणुन कायदेमंडळात पाठवण्यासाठी योग्य आहेत असे सांगितले.

**सदाशिव वेळकर :**

- मुंबईमध्ये प्रार्थना समाजातर्फे कामगार नावाचे वृत्तपत्र सुरु केले होते. पुढे हे वृत्तपत्र सुबोधपत्रिकेत विलीन करण्यात आले.

**स्वदेशी आणि कामगार चळवळ :**

- कामगार चळवळीचा उपयोग राष्ट्रीय चळवळीसाठी केला पाहिजे.
- ही सर्वप्रथम कल्पना शि.म.परांजपे यांच्या डोक्यात आली व त्यांनी ती लोकमान्य टिळकांना सांगितली.
- लोकमान्य टिळकांनी स्वदेशी चळवळीच्या काळात चिचपोकळी भागात सभा घेतल्या. म्हणुन त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर कामगारांनी सहा दिवस संप केला.

**सेंच्युरी मिलमध्ये हरताळ (डिसेंबर 1908) :**

- सी.एन.वाडीया यांची मिल होती.
- मागणी – मजुरीत 25 टक्के वाढ करणे, एक महिनयाचा बोनस देणे.
- नेतृत्व – एच.बी.मांडवाले, कांजी हारकदास, उमर सोभाणी, सी.के.बोले.
- शेवटी पोलीस आयुक्त सी.ए. विसेंट मध्यस्थीने मालकांनी 20 टक्के मजुरीत वाढ व विशेष बोनस जाहीर करण्यात तयार झाले.

**1909 :**

- रॅम्से मॅकडोनाल्ड व त्यांच्या पत्नी मुंबईत आल्या असताना तसेच 1912 च्या जुलैमध्ये महात्मा गांधीचे सहकारी हेन्री पोलाक मुंबईत आले असताना त्यांना कामगार सल्ल्यांमधुन सि.के.बोलेंनी फिरवुन येथील प्रश्नांची ओळख करुन दिली.
- याच काळात – ना.म.जोशी यांच्यामुळे कामगारांना शिक्षण देण्यासाठी करीमभॉय व दोराब टाटा यांनी शाळा सुरु केल्या.

**कामगार हितवर्धक सभा (1909) :**

- सदस्य – भिवाजी नरे, सी.के.बोले, बॅ. हरिशचंद्र तालचेरकर, कृष्णराव केळुसकर
- कार्याध्यक्ष : सी.के.बोले
- सभेचे मुखपत्र – कामगार समाचार
- सभेचे उद्दिष्ट – कामगारांसाठी शिक्षण, व्यसनमुक्ती, कामगारांना कायदेशीर सल्ला, मालकांसोबत होणाऱ्या तंट्यात कामगारांना मदत करणे.
- 12 तास कामाचा दिवस असावा.
- कामावर असताना दुखापत झाल्यास नुकसानभरपाई मिळावी.
- कामगारांच्या मुलांची शिक्षणाची सोय व्हावी.
- कामगारांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली जावी.

**सोशल सर्व्हीस लीग (1911) :**

- सदस्य – ना.म.जोशी, गोपाळ देवधर, नरेश आप्पाजी द्रविड
- कामगारांचे हितवर्धन करणारी सोशल सर्व्हीस लीग.
- मुंबईचे पोलीस आयुक्त एस.एम.एडवर्ड किंवा इतर अधिकाऱ्यांची मध्यस्थ म्हणुन मदत घेत.

**1919 वॉशिंग्टन डी.सी. (आंतरराष्ट्रीय कामगार संघटना) :**

- आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची जी परिषद झाली त्यात हिंदुथानच्या कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सरकारने ना.म.जोशींचीच नेमणुक केली.
- सोशल सर्व्हीस लीग या संघटनेतर्फे हे या परिषदेसाठी गेले होते.

**मद्रास लेबर युनियन (एप्रिल 1918) :**

- संस्थापक – बी.पी.वाडीया
- सदस्य – रामानजुलु नायडु, जी. चेल्वपती चेट्टीयार

- संघटीत स्वरुपातील पहिली कामगार संघटना म्हणुन उल्लेख केला जातो.

### मुंबई कामगार समिती (1 जानेवारी 1920) :

- जेकब गिरणीतील कामगारांना बोनस मिळावा यासाठी संप पुकारला त्यादरम्यान या समितीची स्थापना केली.
- अध्यक्ष – न्या. नारायण गणेश चंदावरकर
- उपाध्यक्ष – जोसेफ बॅप्टीस्टा
- पगारात 50 टक्के वाढ करावी.
- कामाचे तास कमी करावेत.
- दररोज दुपारी एक तास सुटी असावी
- दर महिन्याचा पगार 15 तारखेला मिळावा.
- अपघात झाल्यास नुकसानभरपाई दूयावी
- संपकाळातील वेतन दिले जावे.

### सफाई कामगारांचा संप (1920) :

- मुंबई महानगरपालिवेच्या सफाई कामगारांनी संप केला होता. यासाठी सफाई कामगार मंडळाची स्थापना सेनापती बापट यांनी केली होती.

### ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (1920) (AITUC) :

- 31 ऑक्टोंबर 1920 : मुंबईत एम्पायर नाट्यगृहात लाला लजपतरायांच्या अध्यक्षतेखाली पहिले अधिवेशन भरले.
- स्वागत समितीचे अध्यक्ष – बॅ. जोसेफ बॅप्टीस्टा, दिवाण चमणलाल
- महाराष्ट्रीयन महिला – अवंतीकाबाई गोखले, नागुताई गोरे.
- इंग्लंडमधील मजुर पक्षाचे – कर्नल वेजवुड हजर होते.
- व्यापारी व उद्योगपती – लक्ष्मीदास तेरसी, ललुभाई सामळदास, लालजी नारायणजी, हंसराज ठाकरसी, उमर सोभानी
- अध्यक्षीय भाषणात लालाजींनी संघटीत व्हा, चळवळ करा आणि लोकांना शिकवा.
- अधिवेशनातील ठराव – कामगारांना मताधिकार द्यावा, विधिमंडळात जसा व्यापाऱ्यांचा प्रतिनिधी, उद्योगपतींचा प्रतिनिधी असतो तसा कामगारांचा प्रतिनिधी निवडला जावा.

**✻ महत्वाचे :**

- **लोकमान्य टिळक हे AITUC शी संबंधीत होते, परंतु मृत्यु झाल्याने ते उपाध्यक्ष होवु शकले नाही.**
- **महात्मा गांधी AITUC शी संबंधीत नव्हते.**

### 1881फॅक्टरी ॲक्ट

- मुंबईतील गिरणी मालक संघटनेने सरकारला फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याची विनंती वेली. त्यानुसार अत्यंत सौम्य व मर्यादीत स्वरूपाचा 1881 चा फॅक्टरी ॲक्ट लागू केला. सदरील कायदा 100 पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या गिरणीला लागू पडत असे. 7 ते 12 या वयोगटातील मुलांना कामगार म्हणून नियुक्त करू नये, 9 तासांपेक्षा जास्त वेळ मुलांना काम देऊ नये, अशा तरतुदी होत्या.

### 1891 चा फॅक्टरी ॲक्ट

- 1890 च्या बर्लिन परिषदेत स्त्रिया, बालकांच्या प्रशांवर चर्चा होऊन भारतीय कापड गिरणी उदयोगात सुधारणा करावी अशी मागणी करण्यात आली. त्यानुसार मेजर लेथब्रीजच्या अध्यक्षतेखाली सरकारने कमिशन नियुक्त वेले. त्याच्या अहवालाच्या आधारे 1891 चा फॅक्टरी ॲक्ट करण्यात आला. तो कायदा **1 जानेवारी** 1892 पासून लागू करण्यात आला.
- जेथे 50 किंवा त्यापेक्षा जास्त कामगार चार महिन्यांपेक्षा अधिक काळ काम करतात ती जागा म्हणजे फॅक्टरी होय.

- स्त्रियांसाठी कामाचे तास 11 असून दुपारी 1 ते 1.30 विश्रांती. तसेच त्यांना सकाळी 6 पूर्वी कामावर बोलावू नये व सायंकाळी 6.30 नंतर कामासाठी थांबवू नये.
- आठवड्याची सुट्टी रविवारी ठेवावी. तसेच कामगारांना पुरेशा सोयी पुरवाव्यात.
- बालकामगारांना (वय 9 ते 14) कामाचे तास साडेसहापेक्षा जास्त असू नयेत.

### 1911फॅक्टरी ॲक्ट

- स्मिथ कमिशनच्या अहवालावर आधारित 1911 चा फॅक्टरी ॲक्ट लागू करण्यात आला. त्या द्वारे मुलांच्या कामाचे तास 6 करण्यात आले.
- स्त्रियांच्या कामावर रात्रपाळीची बंदी घालण्यात आली.
- पुरुषांच्या कामाचे 12 तास निर्धारित करण्यात आले.

### 1938 चा बालमजुराचा कायदा

- रेल्वे व गोदीमध्ये सामानाची ने-आण करण्यासाठी 15 वर्षांखालील मुलांना या कायद्यान्वये बंदी घालण्यात आली. 1939 मध्ये आगपेटीच्या व्यवसायात 12 वर्षांखालील मुलांना कामावर घेण्यास बंदी घालण्यात आली.

| क्र. | संघटना | वर्ष | संस्थापक |
|---|---|---|---|
| 1. | Working Men's Club | 1872 | शशीपाद बॅनर्जी |
| 2. | बॉम्बे मिल ओनर्स असोशिएशन | 1875 | मंगलदास नथुभाई, दिनशॉ पेटीट, मोरारजी गोकुळदास |
| 3. | बॉम्बे मिल हॅंड्स असोशिएशन | 1884 | ना.मे.लोखंडे |
| 4. | दि.प्रिंटर्स युनियन (कलकत्ता) | 1905 | - |
| 5. | बॉम्बे पोस्टल युनियन (मुंबई) | 1907 | - |
| 6. | कामगार हितवर्धक सभा | 1909 | सि.वे.बोले, नरे, तालचेलकर |
| 7. | सोशल सर्व्हिस लिग | 1910 | ना.म.जोशी, देवधर, नरेश द्रविड |
| 8. | मद्रास लेबर युनियन | 1918 | बी.पी.वाडीया |
| 9. | अहमदाबाद टेक्स्टाईल लेबर असोशिएशन | 1918 | महात्मा गांधी |
| 10. | आंतरराष्ट्रीय कामगार संघटना | 1919 | - |
| 11. | मुंबई कामगार समिती | 1920 | न्या. नारायण गणेश चंदावरकर |
| 12. | ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC) | 1920 | लाला लजपतराय |
| 13. | हिंदुस्थान लेबर सोशालिस्ट पार्टी | 1923 | श्रीपाद अमृत डांगे, जोगळेकर |
| 14. | बॉम्बे टेक्स्टाईल लेबर युनियन | 1926 | ना.म.जोशी, सरचिटणीस - रघुनाथ बखले |
| 15. | कामगार शेतकरी पक्ष | 1927 | CPI - India चा प्रकट पक्ष, श्रीपाद अमृत डांगे |
| 16. | इंडियन ट्रेड युनियन फेडरेशन | 1929 | व्ही.व्ही.गिरी |
| 17. | वऱ्हाड बिडी कामगार संघ (नागपुर) | 1931 | एन.एल.हरदास |
| 18. | इंडियन फेडरेशन ऑफ लेबर | 1941 | मानवेंद्र रॉय |
| 19. | इंडियन ट्रेड युनियन काँग्रेस-इंटक | 1947 | सरदार वल्लभभाई पटेल |
| 20. | शेतकरी कामगार पक्ष | 1947 | शंकरराव मोरे, केशवराव जेधे |
| 21. | स्वतंत्र मजुर पक्ष | 1936 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| 22. | तांब्या पितळेंची भांडी तयार करणाऱ्यांची संघटना | 1936 | एस.एम.जोशी (पुणे) |
| 23. | बॉम्बे मिल मजुर युनियन | 1945 | स.का.पाटील |

## कामगार चळवळ (प्रश्न आणि उत्तर)

- 1875 मध्ये कामगारांना एकत्रित करून त्यांची कामगार संघटना स्थापन करण्यात ....... यांनी पुढाकार घेतला होता. **– सोराबजी शापूरजी**
- पहिला रेल्वेमार्ग मुंबई ते ठाणे हा इ.स. ..... मध्ये टाकला गेला. – 1853
- कोण/ कोणत्या वृत्तपत्रांनी कामगार वर्गासाठी 19 शतकाच्या शेवटच्या काळात लिखाण केले? **– नेटिव्ह ओपिनियन, रास्त गोफ्तर, इंदुप्रकाश, दीनबंधू, सुबोधपत्रिका.**
- Bombay Mill Hands Association' ही देशातील पहिली कामगार संघटना ......... नी स्थापन केली. **– नारायण मेघाजी लोखंडे**
- 23 सप्टेंबर 1884 रोजी त्यांनी मुंबईच्या ....... भागात कामगारांची पहिली ऐतिहासिक सभा भरवली होती. **– परळ**
- 15 ऑक्टोबर ...... रोजी त्यांनी 5500 कामगारांच्या सह्यांचे एक निवेदन फॅक्टरी कमिशनच्या अध्यक्षाला दिले होते. – 1884
- इ.स. ...... मध्ये मुंबईच्या प्रमुख गिरणी मालकांनी एकत्र येऊन 'Bombay Mill Owners Association' ही संघटना स्थापन केली. – 1875
- प्रारंभी कापड उद्योग ...... व ....... येथेच केंद्रित झाला होता कारण तेथील सागरी आर्द्र हवामान. **– मुंबई, सुरत**
- इ.स. 1877 मध्ये ...... येथे प्रथम एम्प्रेस मिल ही कापड गिरणी सर जमशेटजी टाटा यांनी काढली. **– नागपूर**
- पहिल्या फॅक्टरी कमिशनचे अध्यक्ष कोण होते? **– अबुर्ट नॉट**
- इ.स. 1851 मध्ये मुंबई प्रांतात .......... यांनी 'स्पीनिंग व विव्हिंग कंपनी' या नावाची पहिली कापड गिरणी सुरू झाली. **– कावसजी दावर**
- माणेकजी पेटीट यांनी दुसरी जिनिंग इ.स. ...... मध्ये सुरू केली. – 1854
- 'दीनबंधू'च्या 11 ऑगस्ट 1885 च्या अंकात 'आमच्या इंग्रज सरकारच्या राज्यात गिरण्यांच्या मालकांची झोटिंगशाही' हा अग्रलेख ...... लिहिला. **– नारायण मेघाजी लोखंडे.**
- 500 पेक्षा जास्त कामगार असतील तर कामगार कल्याण अधिकारी नियुक्त करावा तरतूद कोणत्या कामगार कायद्याने केली. – 1948
- ....... मध्ये बॉम्बे पोस्टल युनियन ही संघटना स्थापन झाली. – 1907
- मद्रास लेबर युनियनची स्थापना 19 एप्रिल 1918 रोजी झाली. ही पहिली आधुनिक कामगार संघटना होय, ........ व ........ यांनी ही संघटना स्थान केली. **– बी. पी. वाडीया व कल्याण सुंदरम**
- ....... मध्ये रेल्वे कामगार महासंघाची स्थापना झाली. – 1925
- कामगारांचे शाही कमिशन 1929 मध्ये ... अध्यक्षतेखाली नेमले होते. **– व्हीटले**
- हिंदूस्थान मजदूर सेवक संघ ...... मध्ये स्थापन झाला. – 1934
- ...... मध्ये संयुक्त खानदेश मजूर फेडरेशनची स्थापना झाली. **– ऑक्टोबर 1937**
- इंडियन फेडरेशन ऑफ लेबरचे संस्थापक .......... व त्यांचे अनुयायी आहेत. **– एम. एन. रॉय**
- अहमदाबादच्या गिरणी कामगारांचे प्रश सोडविण्यासाठी कोणी मजूर महाजन संघाची स्थापना केली होती? **– महात्मा गांधींनी**
- अखिल भारतीय रेल्वे कर्मचारी संघ कधी स्थापन झाला? – 1922
- 1944 मध्ये मुंबई गोदी कामगार संपाचे नेतृत्व ..... यांनी केले. **– अनंतराव चित्रे**
- ........ यांनी गांधीजींच्याच मार्गदर्शनाखाली अहमदाबाद टेक्सटाईल लेबर युनियनची स्थापना केली. **– अनुसया बेन**
- डिसेंबर 1948 मध्ये समाजवाद्यांनी ........ ही श्रम संघटना स्थापन केली. **– हिंद मजदूर सभा**

- 1955 साली भारतीय जनसंघ या पक्षाने ......... स्थापन केला. **– भारतीय मजदूर संघ**
- कोणत्या कायद्यानुसार केंद्र व घटक सरकारांना कामाचे वेतन ठरविण्याचा अधिकार प्राप्त झाला. **– 1948 चा किमान वेतन कायदा**
- Indian Trade Union Congress (इंटक) ही ....... नेत्यांनी स्थापन संघटना होती. **– काँग्रेस**
- कोणी इ.स. 1945 मध्ये बॉम्बे मिल मजदूर युनियन ही संघटना स्थापन केली होती. **– स. का. पाटील**
- इ.स. ..... मध्ये राष्ट्रीय मिल मजदूर संघ स्थापन झाला. – 1947
- इ.स.1918 साली मुंबईतील कामगारांना पीपल्स युनियन ही संघटना स्थापन करण्याचा उपदेश कोणी केला होता. **– शाहू महाराज**
- 15 मे 1938 रोजी देवरूख येथील सभेत कोणी म्हटले, 'बहुसंख्याक असा शेतकरी व कामगार वर्ग हा देशाचा खरा सत्ताधारी वर्ग बनला पाहिजे.' **– बाबासाहेब आंबेडकर**

## 2. ब्रिटिश कालीन कायदे

### भारतीय कौन्सिल कायदा 1909

- **कायदा पारित होण्यासाठी कारणीभूत घटक :**
  1. 1892 च्या कायद्याने भारतीय नेत्यांचे समाधान झाले नव्हते
  2. कर्झनची राजवट
  3. आर्थिक शोषणासंबंधीचे लिखाण
  4. देशी वृत्तपत्रांची सुधारणांची मागणी
  5. ब्रिटिशांचे फोडा व जोडा धोरण, मुस्लीमांना खुश ठेवण्याचे धोरण
- 1907 – सर अरुण्डेल समितीच्या शिफारशी नुसार हा कायदा तयार करण्यात आला.
- याच कायद्याला 'मोर्ले-मिंटो' सुधारणा कायदा असे देखील म्हणतात. यातील 'लॉर्ड मोर्ले' हा भारतमंत्री तर 'लॉर्ड मिंटो' हा व्हाईसरॉय होता.
- व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात व्हाईसरॉय आणि 7 सर्वसाधारण सदस्य आणि 1 असाधारण सदस्य होते.
- या कायद्याने केंद्रीय तसेच प्रांतिक कायदेमंडळाचा विस्तार केला.
- केंद्रीय कार्यकारी मंडळातील सदस्य (9 कार्यकारी सदस्य वगळता) संख्या 16 वरुन 60 केली. त्यातील 28 नामनिर्दिशत तर 32 गैरसरकारी सदस्य असतील. अशा रीतीने, केंद्रीय कायदेमंडळाची महत्तम सदस्यसंख्या 69 असेल. त्यांपैकी 37 सरकारी व 32 गैर-सरकारी असतील.
- **प्रांतिक विधीमंडळातील सदस्य संख्या एकसारखी नव्हती. ती पुढीलप्रमाणे –**

  बंगाल – 52

  बॉम्बे, मद्रास, संयुक्त प्रांत – 47

  पुर्व बंगाल व आसाम – 41

  पंजाब – 25

  बर्मा – 16
- या कायद्याने प्रथमच भारतीयांना व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात सदस्य म्हणुन घेण्यात आले. (पहिले भारतीय – 'सतेंद्रनाथ सिन्हा' त्यांची नियुक्ती कायदा सदस्य म्हणुन झाली. 1909) या पुर्व 1907 ला भारत मंत्र्यांच्या कार्यकारी मंडळात 2 भारतीयांची नेमणुक झाली होती.
- के.जी. गुप्ता, सय्यद हुसेन बिलग्रामी
- या कायद्याने स्वतंत्र मतदारसंघ संकल्पना मान्य करुन 'मुस्लिमांना' धर्मावर आधारित प्रतिनिधीत्व दिले. या नुसार मुस्लीम सदस्य फक्त मुस्लीम मतदार निवडणार होते. (6 जागा)
- याच कायद्याने नगर मंडळे, व्यापारी संघटना, विद्यापीठे, जमीनदार यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व दिले गेले.
- स्वतंत्र मतदारसंघ निर्माण केल्याने 'लॉर्ड मिंटो' याला 'स्वतंत्र मतदारसंघाचे जनक' म्हणतात.
- या कायद्याने प्रथमच पुर्णत: निवडणूकीचे तत्व मान्य केले. या कायद्यानुसार पहिल्यांदा निवडणूक आयोगाची संकल्पना उदयास आली.
- **या कायद्यावर झालेल्या वेगवेगळ्या टिका :**
  1. महात्मा गांधी – ''मोर्ले-मिंटो सुधारणा आपल्या नाशाचे कारण ठरले आहे.''
  2. के.एम.मुन्शी – या सुधारणांनी ''उदयोन्मुख लोकशाहीला भोसकले आहे.''
  3. जवाहरलाल नेहरु – स्वतंत्र मतदारसंघांमुळे ''मुस्लीमांच्या सभोवती राजकीय अडथळा निर्माण झाला, ज्यामुळे ते उर्वरित भारतापासून वेगळे पडले, आणि शेकडो वर्षांपासून चालु असलेल्या एकात्मिकरणाच्या प्रक्रियेला खीळ बसली. हा अडथळा

मर्यादीत मताधिकारामुळे सुरुवातीला छोटा होता, मात्र मताधिकाराच्या प्रत्येक विस्ताराबरोबर तो वाढत गेला व त्याने संपूर्ण राजकीय व सामाजिक जीवनाच्या संरचनेला प्रभावित केले.''

4. लॉर्ड मोर्ले – लॉर्ड मिंटोला लिहिलेल्या पत्रात त्याने योग्यच म्हटले की, स्वतंत्र मतदारसंघ देऊन ''आपण ड्रॅगनचे दात पेरत आहोत आणि त्याचा हंगाम निश्चितच कटू असेल.''
5. लॉर्ड मिंटोच्या मते, 'वसाहतवादाच्या मार्गाने संसदीय लोकशाही भारतात स्थापन करण्याच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वाचा टप्पा ठरला.'
6. या कायद्यानुसार भारतीयांना काही राजकीय सवलती प्राप्त झाल्या हे नक्कीच. या कायद्याची नकारात्मक बाजू विचारात घेऊन त्यावर टीकाही वेली गेली.
7. डॉ. ए. बी. किथ या ब्रिटिश इतिहासकाराच्या मते, 'स्वशासनाच्या अधिकारासाठी चाललेला प्रचार थांबविण्यात हा कायदा अयशस्वी ठरला.'
8. डॉ. ईश्वरीप्रसाद यांच्या मते, 'देशातील एका विशिष्ट गटाचे समाधान करणे, काँग्रेसमधील फुटीर राजकारणाचा फायदा घेऊन मवाळांना खुश करण्याचा व मवाळांचे शासनामध्ये सहकार्य मिळवून घेणे हा या कायद्याचा मूळ हेतू होता.'
9. के. एम. मुन्शीच्या मते, 'या कायद्याने आमच्या लोकशाहीला ठार मारले आहे.'
10. डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनी म्हटले, '1909 चा कायदा म्हणजे जन्मास आलेले एक मृत अर्भकच होय.'

**※ महत्वाचे :**

▲ **या कायद्यानुसार प्रथमच सार्वजनिक हिताच्या कोणत्याही प्रश्नावर प्रस्ताव सादर करण्याचा अधिकार देण्यात आला. यालाच अधिन राहुन पहिला प्रस्ताव 25 पेब्रुवारी 1910 ला गोपालकृष्ण गोखले यांनी सादर केला.**

## भारतीय सरकार कायदा 1919

▶▶ **कायदा पारित होण्यासाठी कारणीभूत घटक :**

1. मवाळ नेत्यांची 1909 चा कायदा बद्दलची नाराजी
2. राष्ट्रीय सभा व मुस्लीम लीग– लखनऊ करार काँग्रेसचे नेतृत्व जहालांकडे
3. होमरूल लीग चळवळीचा प्रभाव
4. क्रांतिकारकांचे देशातील व देशाबाहेरील कार्य

▶▶ यालाच 'मॉन्टेग्यु – चेम्सफोर्ड' कायदा असे देखील म्हणतात.

▶▶ माँटेयु हा भारतमंत्री तर चेम्सफोर्ड हा व्हाईसरॉय होता.

▶▶ 20 ऑगस्ट 1917 ला ब्रिटीश सरकारने घोषणा केली की, भारतात टप्प्याटप्प्याने जबाबदार सरकार स्थापन वेले जाईल याच हेतुने 1919 ला हा कायदा पारित केला. 1921 ला हा कायदा अंमलात आला.

▶▶ 1793 पासुन भारत सचिवाला वेतन भारताच्या तिजोरीतुन मिळत होते ते आता बंद होऊन ब्रिटीश तिजोरीतुन दिले जाईल.

▶▶ उच्चायुक्त (High Commissioner) नावाने नविन पद तयार करुन त्याकडे भारतमंत्र्यांची काही कामे सोपवली आणि त्याचा पगार भारताकडुन होता. (पहिले उच्चायुक्त – विल्यम मेयर)

▶▶ केंद्रीय आणि प्रांतिक विषय वेगळे करुन केंद्राचे प्रांतावरील नियंत्रण कमी करण्यात आले. प्रांतिक विषयांचे 'सोपीव' आणि राखीव' असे दोन गट करण्यात आले.

1. सोपीव – या विषयाचे प्रशासन गव्हर्नर मार्फत मंत्र्यांच्या सहाय्याने केले जाईल.
2. राखीव – या विषयाचे प्रशासन गव्हर्नर मार्फत कार्यकारी मंडळातील सदस्य पाहतील. याच दुहेरी शासन पध्दतीला द्विदल राज्यपध्दती (Dyarchy) असे म्हणतात. (8 प्रांतात)

| क्र. | राज्य | क्र. | राज्य | क्र. | राज्य | क्र. | राज्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | बंगाल | 2. | बॉम्बे | 3. | मद्रास | 4. | बिहार |
| 5. | मध्य प्रांत | 6. | पंजाब | 7. | आसाम | 8. | संयुक्त प्रांत |

▶▶ या कायद्यानुसार केंद्रात प्रथमच एकसदनी कायदेमंडळाच्या ऐवजी 'द्विसदनी कायदे मंडळ' निर्माण वेले.

▶▶ यानुसार राज्यसभेचा कार्यकाळ 5 वर्षे तर केंद्रीय कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ 3 वर्षे होता.

▶▶ **भारतीय शासन व्यवस्थेत करण्यात आलेले बदल :**

1. या कायद्यानुसार केंद्र व प्रांतीय सरकार यांच्या अधिकार कक्षा स्पष्ट केल्या गेल्या.
2. अ) केंद्र सरकारकडे सोपवण्यात आलेली खाती : संरक्षण खाते, परराष्ट्र संबंध, संस्थानिकांशी संबंध, दळणवळण, पोस्ट, तारायंत्र, फौजदारी व मुलकी कायदा, चलन व मुद्रा, केंद्रीय महसुलाचे विषय, रेल्वे, अ. भा. सेवा, व्यापारी, जनगणना.
3. ब) प्रांतीय सरकारांकडे सोपवण्यात आलेली खाती :स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षण, वैद्यक विभाग, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, शेती, कालवे व पाटबंधारे, कृषी महसूल, दुष्काळी मदत, वनविभाग, पोलीस, कारागृहे, उद्योगधंदे.
4. प्रांतिक यादीत समाविष्ट न करण्यात आलेले विषय हे केंद्र सरकारच्या अधिकारात येत होते.
5. प्रांतिक शासन व्यवस्थेसंबंधी 1919 च्या कायद्यातील तरतुदी : 1919 च्या कायद्यानुसार प्रांतात द्विदल शासनपद्धती सुरू करण्यात आली. प्रांतिक खात्याची विभागणी दोन गटांत करण्यात आली.

| राखीव खाती (Reserved) | सोपीव खाती (Transfered) |
|---|---|
| 1) वित्त प्रशासन | 1) स्थानिक स्वराज्य संस्था |
| 2) जमीन महसूल, जमीन सुधारणा | 2) शिक्षण |
| 3) दुष्काळी मदत | 3) वैद्यक |
| 4) न्याय, श्रमिक तंटे | 4) सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता |
| 5) पोलीस, कारागृहे | 5) सार्वजनिक कल्याण कामे |
| 6) वृत्तव्यवसाय | 6) शेती, सहकारी संस्था |
| 7) कालवे-पाटबंधारे | 7) उद्योग |
| 8) कारखाने-खाण मजूर | 8) रस्ते-पूल |

## अँग्लो इंडियनांचे शिक्षण

▶▶ थोडक्यात एवढेच की 1919 च्या कायद्याने केंद्रात द्विसदनी कायदेमंडळ तर प्रांतात द्विदलीय राज्यपध्दती निर्माण केली.

▶▶ व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात असलेल्या 8 सदस्यांपैकी 3 सदस्य भारतीय असतील अशी तरतुद केली.

▶▶ शीख, भारतीय ख्रिश्चन, अँग्लो इंडियन, युरोपीयन स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले.

▶▶ या कायद्याने वेंद्रीय अर्थसंकल्पातुन प्रांतांचे अर्थसंकल्प वेगळे करण्यात आले.

▶▶ या कायद्यात 'लोकसेवा आयोग' निर्माण करण्याची तरतुद होती. त्यानुसार ली कमिशन च्या शिफारशीने 1926 ला केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली.

▶▶ या कायद्यात अशी बाब नमुद होती की, या कायद्याचा अंमल झाल्यावर त्याची अंमलबजावणी कशी होते, हे तपसण्यासाठी 10 वर्षांनी एक आयोग स्थापन करावा.

▶▶ 4 जुलै, 1918 ला मॉटफोर्ड अहवाल प्रकाशित झाल्यानंतर टिळकांनी तीन अग्रलेख लिहिले.

1) 'उजाडले पण सूर्य कोठे आहे'
2) 'जनाब देहली तो बहोत दूर है'
3) आणि 'कबूल वा नाकबूल'

▲ भारत सरकार कायदा 1919 मध्ये उद्देशिका, 47 कलमे व 2 परिशिष्ट्ये होती.

▲ 1919 च्या कायद्यानुसार सर्वप्रथम 1920 मध्ये निवडणूका झाल्या आणि पहिल्या केंद्रीय कायदे मंडळाची निर्मिती 9 फेब्रुवारी 1919 ला झाली. या नंतर 1923, 1926, 1930, 1934, 1945 अशी एवुण 6 वेळा केंद्रीय कायदे मंडळाची निर्मिती झाली.

- 9 फेब्रुवारी 1921 रोजी भरलेल्या केंद्रीय कायदे मंडळाच्या अध्यक्षेपदी सर फ्रेडरिक व्हाइट तर उपाध्यक्ष पदी सच्चिदानंद सिन्हा यांची निवड झाली.
- केंद्रीय कायदे मंडळाचे पहिले भारतीय अध्यक्ष म्हणून विठ्ठल भाई पटेल (1925) यांची निवड झाली.
- राज्यसभेचे पहिले अध्यक्ष म्हणून अलेक्झांडर मुडीमैन यांची निवड झाली होती.
- 1 एप्रिल 1921 ला प्रांतासाठी सुरु झालेली द्विदलीय राज्य पध्दती 1 एप्रिल 1937 पर्यंत लागू होती.

- त्यामुळे ब्रिटिश संसदेने दुसरी समिती नेमली व त्या समितीने कंपनीला 14 लक्ष कर्ज हे 4 टक्के व्याजदराने मंजुर केले व कंपनीसाठी नियामक कायद्याची तरतुद केली.

## 1919 च्या कायद्यावरील टिका

- सी. वाय. चिंतामणी यांच्या मते, 'सारी सत्ता राज्यपालाच्याच हातात होती. गव्हर्नर मंत्र्यांच्या कार्यात केव्हाही हस्तक्षेप करू शकत असे.'
- त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या मते, 'हिंदुस्थानात अशा प्रकारे संसदीय राज्य पद्धत सुरू झाली. पण तीत लोकशाही नव्हती. जबाबदारी नव्हती आणि पराभूत झालेल्या सरकारला राजीनामा देण्याची तरतूदही केलेली नव्हती. त्यामुळे हा नवा कायदा लोकांच्या पसंतीस उतरला नाही.' तत्कालीन ब्रिटिश संसद सदस्यांनी या कायद्याबाबत नाराजी व्यक्त केली होती.
- फिशरच्या मते, 'द्विदल राज्य पद्धती सुरू करून ब्रिटिश सरकारने न्यायपद्धतीचा खून करू नये.'
- मॅकिलनच्या मते, 'या विधेयकातील द्विदल राज्यपद्धतीचा वापर म्हणजे डाका घालण्यासारखे आहे.
- प्रो. कुपलॅंडच्या मते, 'ही द्विदल राज्यप्रणाली तिच्या निर्मात्याचा हेतू पूर्ण करण्यास असमर्थ ठरली.' लॉर्ड क्रुकच्या मते, 'हे विधेयक भारतीय आंदोलनास उपयुक्त ठरणारे आहे.'
- राष्ट्रीय काँग्रेसने हा कायदा अपुरा, असमाधानकारक व निराशाजनक आहे असा ठराव पास केला होता. मुस्लीम लीगचेही तेच मत होते.
- पी. ई. रॉबर्टस या इतिहासकाराने 'द्विदल राज्यपद्धती ही संक्रमणकालीन यंत्रणा म्हणून चांगली होती' असे म्हटले आहे. द्विदल राज्यपद्धती अयशस्वी होण्यास खालील गोष्टी कारणीभूत होत्या.
- 1) रौलेट ॲक्ट, 2) जालियनवाला बागेतील हत्याकांड, 3) असहकारी चळवळ, 4) 1920 च्या दुष्काळाचा सरकारच्या आर्थिक धोरणावर झालेला परिणाम, 5) स्वराज्य पक्षाचे कायदे मंडळातील अडवणुकीचे धोरण.
- माँटेग्यूने या कायद्यासंबंधी म्हटले होते, 'It is a bridge between Govt by Parliament and Govt. by representative of the people of India

## भारत शासन कायदा 1935


- या कायद्यात एकुण 14 भाग, 321 कलमे आणि 10 परिशिष्टे होती.
- **कायद्यामधील बाबींचे प्रमुख स्त्रोत :**
  1. सायमन अहवाल
  2. नेहरु अहवाल
  3. तिन्ही गोलमेज चर्चा
  4. ब्रिटीश सरकारची श्वेतपत्रिका
  5. लोथियन समिती अहवाल
- या कायद्यात प्रांत व संस्थाने मिळून अखिल भारतीय संघराज्य स्थापन करण्याची तरतूद होती.
- या कायद्याने प्रांतांमधील 'द्विदलीय राज्य पध्दती बंद केली. त्याऐवजी प्रांतिक स्वायत्तता दिली. आणि सर्व खाती लोकप्रतिनिधीकडे दिले. 1937 ला ही पध्दत लागु झाली आणि 1939 ला बंद झाली.
- या कायद्याने केंद्रात द्विदलीय शासनपध्दती सुरु झाली. केंद्रातील विषयांची राखीव आणि सोपीव अशी विभागणी केली. ही पध्दत प्रत्यक्षात आली नाही.

- या कायद्यान्वये मताधिकार वाढवून एकुण लोकसंख्येच्या 10 टक्के लोकांना मताधिकार मिळाला.
- 11 पैकी 6 प्रांतात द्विसदनी कायदेमंडळाची तरतुद करण्यात आली.
- **6 प्रांत पुढीलप्रमाणे :**


| | | |
|---|---|---|
| 1) बंगाल – 250 | 2) बॉम्बे – 175 | 3) मद्रास – 215 |
| 4) बिहार – 152 | 5) आसाम – 108 | 6) संयुक्त प्रांत – 228 |

- **संघराज्य कायदे मंडळ द्विगृही असेल अशी तरतूद करण्यात आली.**

1. **राज्यसभा (Council of States) :** हे स्थाही सभागृह असेल व दर 3 वर्षांनी त्याचे 1/3 सदस्य निवृत्त होतील. राज्यसभेत ब्रिटिश प्रांतांनी निवडून दिलेले 156 सदस्य व संस्थानिकांनी नामनिर्देशीत वेलेले महत्तम 104 सदस्य असतील. ब्रिटिश प्रांतांचे प्रतिनिधी अप्रत्यक्षपणे निवडून दिले जाती.




2. **फेडरल असेंब्लीचा (Federal Assembly) :** कालावधी 5 वर्षांचा असेल. असेंब्लीमध्ये ब्रिटिश प्रांतांनी निवडून दिलेले 250 सदस्य, तर संस्थानिकांनी नामनिर्देशीत केलेले महत्तम 125 सदस्य असतील. ब्रिटिश प्रांतांचे प्रतिनिधी अप्रत्यक्षपणे प्रांतिक कायदेमंडळाच्या सदस्यांकडून एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पध्दतीद्वारे निवडून दिले जातील. (दोन्ही सभागृहांतील निवडणूकीची ही व्यवस्था भारताच्या आजच्या घटनेच्या बिलवूल विरुध्द होती.)




- दलित, महिला, कामगार यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघाची तरतुद केली गेली.
- 1858 च्या कायद्याने भारतमंत्र्यास सल्ला देण्यासाठी निर्माण केलेली 'इंडिया कौन्सिल' रद्द केली.
- रिझर्व्ह बँक (RBI) स्थापन करण्याची तरतुद होती.
- प्रांतिक लोकसेवा आयोग तसेच दोन किंवा अधिक प्रांतासाठी 'संयुक्त लोकसेवा आयोग' स्थापण्यासाठी तरतुद केली. (शेष अधिकार व्हाईसरॉयकडे देण्यात आले)
- संघराज्यीय न्यायालय स्थापन करण्याची तरतुद होती. यामुळे 1937 ला 'फेडरल कोर्टची' स्थापना करण्यात आली. या फेडरल कोर्टाचे प्रथम मुख्य न्यायाधीश सर मॉरीस ग्वेयर होते.

**विषय**

- **संघराज्य पद्धतीतील खाते विभागणी :**

1. संघ यादी : परराष्ट्र व्यवहार, चलन, लष्कर, दळणवळण, आयात-निर्यात, टपाल, तारायंत्र (एकूण खाती 59)
2. प्रांत यादी : पोलीस, तुरुंग, महसूल, शेती, स्थानिक स्वराज्य, शिक्षण, आरोग्य (एकूण खाती 54)
3. समवर्ती सूची : फौजदारी कायदा, विवाह, कामगार संघटना, करार (एकूण खाती 36) या खात्याबाबत संघ शासन व प्रांत शासन यांना कायदे करण्याचा अधिकार होता.

- राज्यकारभारातील विषयांची केंद्रीय, प्रांतिक व संयुक्त अशा तीन सुचित विभागणी करण्यात आली.
- या कायद्याने मुंबई पासुन सिंध बिहार पासुन उडिसा आणि भारतापासुन बर्मा विभक्त करण्यात आले.
- **या कायद्यावर केलेल्या काही टिका :**

1. पंडित नेहरु – 1935 चा कायदा म्हणजे ''एक प्रबळ ब्रेक्स असलेले मात्र इंजिनच नसलेले एक मशिन' आहे.

2. पंडित मदन मोहन – मालवियांच्या मते – हा नवीन कायदा आपल्यावर लादला जात आहे. तो वरकरणी काहीसा लोकशाहीवादी दिसत आहे, मात्र आतून पूर्णपणे पोकळ आहे.''
3. सी.राजगोपालाचारी – यांनी नवीन घटनेला ''द्विशासनापेक्षा खराब'' असे संबोधले.
4. बॅ. जीना – ''संपूर्णपणे कुजलेला, मूलभूतरित्या अयोग्य आणि पूर्णपणे अस्विकाहार्य'' आहे.

## 3. महत्वाचे गव्हर्नर

**वॉरेन हेस्टींग्ज 1773–1785 (साधारणपणे 12 वर्ष)**

**लॉर्ड कॉर्नवॉलिस (1786 ते 1793)**

**लॉर्ड रिचर्ड वेलस्ली (1798 ते 1805)**

**विल्यम बेंटीग (1828 ते 1835)**

**लॉर्ड डलहौसी (1848 ते 1856)**

**लॉर्ड लिटन (1876 ते 1880)**

**लॉर्ड रिपन**

**लॉर्ड कर्झन (1899–1905)**

**लॉर्ड मिंटो (1905 ते 1910) (दुसरा)**

# 4. रयतवारी जमिन महसुल व्यवस्था

## ब्रिटिशपुर्व महाराष्ट्रातील जमिन महसुल व्यवस्था :

- महाराष्ट्रामध्ये पेशवाईच्या सुरुवातीला काही स्थित्यंतरे झाली, परंतु जमीन महसुलाची पध्दत सन 1758 पासुन सुस्थितीत करण्यात आली.
- 1761 नंतर माधवराव पेशव्यांनी कमालधारा पध्दती लागु केली, माधवरावांनी राज्याचा महसुल वाढावा यासाठी ही पध्दत लागु केली होती, परंतु महसुल गोळा करण्यासाठी जुन्याच वतनदारांची, देशमुखांची नेमणुक वेल्याने फारसा महसुलामध्ये बदल झाला नाही.
- पुढे परशुराम परांजपे आणि रघुनाथ बर्वे यांनी नाना फडणीसाच्या आदेशावरुन रत्नागिरी, अंजनवेल सारख्या कोकणातील काही भाग मोजुन प्रतवारीप्रमाणे जमिनीचा सारा निश्चित केला.
- हा सारा कधी कधी 'कमाल धारा' तर कधी-कधी 'तनखा पध्दतीने' वसुल केला जाई.
- सन 1818 पर्यंत जमिन महसुलाचे दर कमी अधिक-प्रमाणात असेच राहिले.

| मराठेशाहीतील महसुल व्यवस्था | दुसऱ्या बाजीराव (पेशवेकालीन) महसुल व्यवस्था |
|---|---|
| महसुल ठरवताना सक्षम पीक पहाणी करूणच महसुल ठरवला जाई. | या काळात 'लिलाव पध्दत' सुरु करण्यात आली. |
| महसुल रोख किंवा वस्तुरुपाने गोळा केला जाई. | जो कोणी जास्त बोली लावेल त्यास महसुल गोळा करण्याचे अधिकार दिले गेले. |
| नैसर्गिक आपत्तीने पीक न आल्यास शेतकऱ्यांचा महसुल माफ केला जाई. | मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची पिळवणुक होण्यास सुरुवात झाली. |

- ज्यावेळी पेशव्यांची सत्ता ऍफिस्टनने हस्तगत केली, त्यावेळी महाराष्ट्रामध्ये कोणत्या प्रकारची जमिन महसुल पध्दत लावावी, त्यातुन 'रयतवारी पध्दत' समोर आली.

## रयतवारी पध्दतीची पार्श्वभुमी :

- बंगाल प्रांतात कॉर्नवालीसने सुरु वेलेल्या कायमधारा पध्दती मधुन वाढलेला महसुलाचा वाटा वंपनीला मिळत नसल्याने रयतवारी पध्दतीचा उदय झाला.
- **पहिला प्रयोग :**
    - मद्रास प्रांतामध्ये कॅ.रिड यांनी सर्वप्रथम बारमहल जिल्ह्यात ही पध्दत लागु केली.
    - थॉमस मन्रोच्या मदतीने कॅ.रिडने उत्पन्नाचा अंदाज बांधुन उत्पन्नाच्या 50 टक्के भुमिकर निश्चित केला.
    - नंतरच्या काळामध्ये मद्रासचे गव्हर्नर थॉमस मन्रो यांनी ती संपुर्ण मद्रास प्रांताला लागु केली.
    - ही पध्दत कायमधारा पध्दती प्रमाणे कायमस्वरुपी नव्हती. तर ती फक्त तिस वर्षांसाठी लागु होती.
    - रयतवारी पध्दतीत भुमीकराची रक्कम रोख स्वरुपात द्यावी लागत असे.

## बॉम्बे प्रांतातील रयतवारी पध्दत :

- जमिनीच्या महसुलाच्या बाबतीत रयत (प्रजा) आणि सरकार यांचा प्रत्यक्ष संबंध असणारी पध्दत ही रयतवारी पध्दत म्हणुन ओळखली जाते.
- बॉम्बे प्रांतात माऊंट एलफीस्टनने ही पध्दत सर्वप्रथम लागु केली.

## रयतवारी पध्दतीबाबत सरकारची भुमिका

- **जमिनदारी पध्दतीस पायबंद घालणे :**
  - कायमधारा पध्दतीमध्ये जमिनीची मालकी जमिनदारांकडे होती, पुढे जेम्स मिल सारख्या विचारवंतांनी, भारतातील शेती व्यवसाय सुधारण्यासाठी प्रत्यक्ष शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यास जमिनीचे मालकी हक्क देणे बंधनकारक केले पाहिजेत असे मत मांडले.
- **कायमधारा पध्दतीमधील दोष दुर करणे :**
  - कायमधारा पध्दतीमध्ये फक्त जमिनदारांचे हित साधले जात होते. अतिरिक्त मिळालेल्या महसुलात कंपनीला वाटा मिळत नसे. त्यामुळे कंपनीने 1809 साली 'सिलेक्ट कमिटी' स्थापन केली, या समितीने 'कायमधारा पध्दती' वस्ती ताशेरे ओढले.
  - समितीने रयतवारी पध्दती अंमलात आणावी यासारखा विचार प्रकट केला.
- रयतवारी पध्दतीवरती जेम्स मिल आणि थॉमस मन्रो यांसारख्या विचारवंतांचा प्रभाव होता.
- सरकारचा जनतेशी संपर्क वाढवण्यासाठी सरकारने अल्पसंख्याक जमिनदारांशी संबंध ठेवण्यापेक्षा हजारो जनतेशी रयतवारी पध्दतीमुळे संपर्क ठेवणे मान्य केले.

## रयतवारी पध्दतीचे गुण :

- जमिनदार पद रद्द केल्याने शेतकऱ्यांचा थेट संपर्क सरकारशी येवु लागला.
- जमिनीची मालकी शेतकऱ्याकडे असल्याने ते स्वत:हा मालक बनले, त्यांना जमिन विकण्याचा, गहाण ठेवण्याचा किंवा जमिन हस्तांतरित करण्याचा अधिकार होता.
- या पध्दतीमध्ये महसुल निश्चित होता.
- नैसर्गिक आपत्तीमध्ये सरकार शेतसारा माफही करत असे.

## रयतवारी पध्दतीचे तोटे :

- शेतमालक व कुळ असे नविन वर्ग निर्माण झाले.
- जमिनदार वर्ग नव्याने निर्माण झाला.
- कुळांची प्रतिष्ठा कमी झाली.
- खेड्यांची एकात्मता नष्ट होवुन समाजाचे विघटन झाले.
- दिलेल्या वेळेत शेतसारा न भरल्यास उपाशी ठेवणे, शौच्यास जाऊ न देणे, म्हशीच्या किंवा गाढवाच्या शेपटीला त्या व्यक्तीचे केस बांधणे तसेच गळ्यात हाडांचे हार घालणे अशा अपमानास्पद शिक्षा दिल्या जात असे.
- शेतसारा भरण्यास अक्षम असलेलेल शेतकरी सावकरांच्या विळख्यात सापडले.
- कर प्रत्येक जमिन क्षेत्रावर होता, शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेल्या संपुर्ण क्षेत्रावर नव्हता.
- शेतकऱ्यांना न्यायालयात अपील करता येत नव्हते.
- महत्वाचे : 1828 साली 'दि रेव्हेन्यु सर्व्हे ॲण्ड असेसमेंट ऑफ दि डेक्कन' या नावाचे स्वतंत्र खाते प्रिंगेलच्या नेतृवाखाली निर्माण करण्यात आली.
- **प्रिंगेलचा सारा आकारणीचा इंदापुर येथील प्रयोग:**
- मराठेशाहीकडुन जिंकलेल्या प्रदेशात, एलफिस्टनने रयतवारी पध्दत सुरु केली. परंतु मराठेशाही मध्ये आणि रयतवारी पध्दतीमध्ये महसुल गोळा करण्याची पध्दत वेग-वेगळी होती. रयतवारीमधील मोजणी व पुर्वीची मोजणी यांमध्ये सुध्दा फरक होता.
- त्यामुळे एडवर्ड स्ट्रॅची या एलफिस्टनच्या मित्राने रयतवारी मध्ये बदल करण्यास सांगितले, त्याला अनुसरुन पुण्याचे कलेक्टर रॉबर्ट क्रिथ प्रिंगेल यांच्याजवळ रयतवारीमध्ये बदल करुन त्यास सुधारणा करण्याचे काम सोपिवले.
- प्रिंगेल हा डेव्हीड रिकार्डोचा शिष्य होता. तो पुण्याचा कलेक्टर होता. त्याच्याकडे पाबळ व इंदापुर या दोन तालुक्यात रयतवारीचा प्रयोग अवलंबण्याची जबाबदारी होती.

- प्रथमत: त्याने इंदापुर तालुक्याची निवड केली. त्यासाथी 1828 ला 'दि रेव्हेन्यु सर्व्हे ॲण्ड असेसमेंट ऑफ दि डेक्कन' या नावाचे स्वतंत्र खाते प्रिंगेलच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आले.
- जमिन मोजुन शेतसारा ठरवण्यासाठी 12 ब्राम्हणांच्या नेमणूका करुन हुजुर कचेरी नावाचा विभाग सुरु केला. या हुजुर कचेरीचे दप्तर सांभाळणे व भाषांतरासाठी सिध्देश्वरशास्त्री टोवेकर यांची नियुक्ती करण्यात आली.
- प्रिंगेल मोजलेल्या जमिन पध्दतीमधुन शेतसारा एकुण उत्पन्नाच्या 55 टक्के ठरवण्यात आला.
- 1828-1829 : शेतसारा ठरवण्याचा प्रिंगलचा इंदापुर प्रयोग प्रथम इंदापुर जुन्नर, पाबळ, भिमथडी, खेड आणि पुरंदर या ठिकाणी लागु केली.
- या पध्दतीचा प्रभाव तत्कालीन बॉम्बे प्रांताचे गव्हर्नर सर जॉन माल्कम यांवर पडला होता.

**प्रिगेलच्या पध्दतीचे अपयश :**

- जमिन मोजणीसाठी व महसुल ठरवण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या हुजुर कचेरीमधील सिध्देश्वरशास्त्री टोकेकर याने विश्वासघात केला.
- स्थानिक अधिकाऱ्यांनी जमिनीची प्रतवारी ठरवताना स्वता:च्या स्वार्थासाठी अनेक चुका वेल्या. त्यामुळे शेतसाऱ्याचा अंदाज कोणालाच आला नाही.

**प्रिंगेलच्या पध्दतीचे फायदे :**

1) जमिन मोजण्यासाठीचे एकर हे इंग्लंडमधील माप महाराष्ट्रामध्ये सुरु झाले.
2) जमिनीची विंमत हा आधार जमिन महसुल ठरवताना घ्यावा हे ठरविले.
3) जमिनीवरचे इतर कर रद्द करुन जमिन महसुल एकमेव कर आकारला जावु लागला.

- **इंदापुर/प्रिंगेलच्या नंतर महसुल व्यवस्थेत झालेले बदल :**
- 1836 : गोल्डस्मिथ व विंगेट अधिकाऱ्यांनी मोहोळ व माढा तालुक्यांची पाहणी केली आणि 30 वर्षासाठी सारा वसुलीच्या शिफारशी केल्या.
- 1867 : फ्रान्सीस व वॅडिंटन या दोघा अधिकाऱ्यांनी इंदापुर तालुक्याची पुन्हा पाहणी केली.
- 1836 : या अधिकाऱ्यांनी वाढवलेल्या शेतसाऱ्याविरुध्दात पुढे दख्खनचे दंगे झाले.

## दख्खनचे दंगे

**दख्खनच्या दंग्याची पार्श्वभूमी:**

- हा उठाव प्रामुख्याने सावकारांच्या विरोधात होता. महाराष्ट्रात ब्रिटिशसत्ता स्थापित झाल्यापासून या उठावाची पाश्वर्भूमी तयार होत गेली. मुंबई प्रांताचा गव्हर्नर स्टूयूअर्ट माऊंट एल्फिन्स्टन (1779-1859) याने अनेक प्रशासकीय व महसूली बदल घडवून आणले. यामध्ये जमीन महसूल पद्धतीत केलेला बदल हा महत्त्वपूर्ण होता.
- 1828 मध्ये रॉबर्ट कीथ प्रिंगल यांने रयतवारी पद्धती लागू केली. प्रिंगलवर उपयुक्ततावादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. रयतवारी पद्धतीचा पहिला परिणाम शेतकरी-सावकार यांच्या संबंधांवर झाला.
- नवीन महसूलपद्धती आलेली असली, तरी शेतकऱ्यांची कर्जाची गरज संपलेली नव्हती. सावकारांकडून कर्जउचल होतच होती. सावकार कर्जाऊ रकमेच्या पोटी शेतकऱ्यांचे अधिकचे उत्पन ताब्यात घेत.
- त्यामुळे शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती निर्माण झाली. सरकारने या परिस्थितीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी कर्जाऊ रकमेच्या पोटी कर्जाइतकी जमीन सावकारांना इनाम देण्याचा प्रयत्न केला.
- मात्र सावकारांनी इनाम जमिनी घेण्यास नकार दिला; कारण जमिनी कसण्याचे कसब त्यांच्याकडे नव्हते. परिणामी सावकार-शेतकरी संबंध बिघडत गेले.
- इ. स. 1859 मध्ये ब्रिटिश सरकारने मुदतीचा कायदा लागू केला. या कायद्याने सावकारांना 3 वर्षापर्यंत खटल्याची मुदत मिळाली. मात्र शेतकरी सावकारीकर्जातून मुक्त होणार नाही, अशीच स्थिती निर्माण झाली. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय दयनीय होत गेली.

- इ. स. 1867 मध्ये जे. फॅन्सिस व वॅडिंग्टन याने नवीन जमाबंदी लागू वेली. याचे दर 50 ते 60 टक्क्यांनी जास्त होते. लागू केलेली ही जमाबंदी काही ठिकाणी 86 टक्क्यांपर्यंत होती, तर वैयक्तिक शेतकऱ्यांच्या बाबतीत हीच वाढ 220 टक्के इतकी होती.
- नवीन जमाबंदीबाबत पुण्यातील सार्वजनिक सभेने या प्रकरणात हस्तक्षेप केला व सरकारने या प्रकरणात लक्ष घालावे याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत केला. शेतकऱ्यांच्या निर्माण झालेला असंतोष पाहता सरकारने इ. स. 1874 मध्ये शेतसारा कमी वेला, मात्र याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही.
- उलट शेतकऱ्यांच्या असंतोषाला सार्वजनिक सभेला जबाबदार धरले. इ. स. 1875 मध्ये महाराष्ट्रात या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचा उठाव घडून आला.

**उठाव पसरलेले जिल्हे आणि तालुके:**

- बागलाण तसेच भिमडी, शिरूर, इंदापूर, हवेली, पारनेर, श्रीगोंदा व कर्जत इत्यादी ठिकाणी उठाव झाले.

**दख्खनच्या दंग्याची सुरुवात:**

- इ. स. 1874 मध्ये शिरूर तालुक्यातील करडे गावात पहिला उठाव घडून आला. उठावाचे स्वरूप मर्यादित होते. येथील शेतकऱ्यांनी सारा भरण्यास नकार दिला व सावकारांकडे पाणी भरणे, नापिताची व इतर घरगुती कामे करण्यास नकार दिला. काही ठिकाणी सावकारांवर हल्लेसुद्धा झाले.
- 12 मे 1875 रोजी सुपे येथील शेतकऱ्यांनी उठाव वेला. मारवाडी-गुजर सावकारांवर हल्ले केले. पुढे याची तीव्रता पुणे, अहमदनगर, सातारा, सोलापूर, रतागिरी व अहमदाबाद जिल्ह्यांपर्यंत वाढत गेली.
- कर्जे घेतलेली कागदपत्रे जाळली खतावणीजाळल्या. (खत फोडीचे बंड म्हटले जाते.)
- 15 जून 1875 रोजी भीमथडी जवळील मुंधाळी गावात शेतकऱ्यांनी उठाव केला. यामध्ये त्यांनी सावकारांवर हल्ले केले, मालमत्ता लुटली, गहाणखते जाळून टाकली तर काही सावकारांचे खून वेले.
- यानंतर 22 जुलैला निमभट व 28 जुलैला कान्हाटी या ठिकाणी उठाव.
- इंदापूर कळस (फेब्रुवारी 1875) बाहेरच्या सावकारांकडून कोणत्याही शेतकऱ्याने कर्ज घेऊ नये अशी नियमावली तयार वेली.
- कळस शेजारील अकोले गावाने कळस गावातील सावकरांना मदत वेली.
- हा उठाव साधारण 2 महिने चालला. सरकारने उठावकरी शेतकऱ्यांची धरपकड सुरू वेली, मोठ्या प्रमाणात लोकांना तुरुंगात टाकले.
- शेतकर्यांच्या या उठावात कोणतीही एक व्यक्ती नेता नव्हती. ज्या-ज्या शेतकऱ्यांवर सावकारांकडून अन्याय अत्याचार झालेला होता, ते शेतकरी या उठावाचे नेतृत्व करत होते.
- शेतकरी उठावाची तीव्रता लक्षात घेत सरकारने 'डेक्कन रायट्स कमिशन' नेमले.
- यामध्ये सी. डब्यू. कार्पेटर
- जे. बी. रिची
- सर ऑक्लँड कॉलव्हिल इ. सदस्य होते.
- या कमिशनने उठावाबरोबर येथील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक परिस्थिती, शेतकऱ्यांची पैसा खर्च करण्याची पद्धती व नवीन जमाबंदी आदींचा अभ्यास करून एक अहवाल सरकारला सादर केला.
- या अहवालावर मुंबई सरकारच्या दरबारात चर्चा झाली व दक्षिणेतील शेतकऱ्यांना दिलासा देणारा 'द डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट (1879) मंजूर करण्यात आला. हा कायदा तत्कालीन मुंबई इलाख्याचा गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल (1826-1902) याने मंजूर केला. टेंपलला शेतकऱ्यांच्या परिस्थितीची चांगली माहिती होती. त्यामुळे मंजूर झालेल्या कायद्यावर टेंपलच्या विचारांचा प्रभाव होता. या कायद्याने कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी खालील कलमांचा समावेश केला :
  1) कर्जबाजारी शेतकऱ्यांचे कर्ज सावकाराला एकदम वसूल करता येणार नाही. त्यासाठी सावकाराने दिवाणी न्यायालयात खटला दाखल केला पाहिजे.
  2) न्यायालयाने शेतकऱ्यांची सर्व संबंधित कागदपत्रे पाहून प्रत्यक्ष प्रकरणाचा तपास करावा व निर्णय द्यावा.

3) कर्जाची परतफेड एकदम करणे शक्य नसल्यास न्यायालयाने हप्ते करून द्यावेत.

4) गरज वाटल्यास न्यायालयाला कर्जाच्या व्याजाच्या दरात कपात करण्याचा अधिकार असेल.

5) अत्यंत निकडीच्या प्रकरणात गरज असेल, तर शेतकऱ्यांची जमीन सावकाराला खरेदी करता येईल. अन्यथा अशा प्रकारचा व्यवहार करता येणार नाही.

6) न्यायालयात अशा प्रकारची प्रकरणे न आणता शक्यतो ती स्थानिक स्तरावर 'मुन्सफ' नावाच्या अधिकाऱ्याने मिटवावीत.

7) प्रत्येक खेड्यात जमिनीसंबंधी होणाऱ्या सर्व प्रकरणांची नोंद एका नोंदवहीत करावी. यामध्ये जमिनीवरील कर्ज, जमीन तारण प्रकरण किंवा विशिष्ट तत्त्वावर एखाद्याला जमीन कसावयास द्यावयाची असेल अथवा जमीन विकायची असेल तर त्यासंबंधीच्या नोंदी त्यामध्ये स्पष्टपणे नोंदवाव्यात. ह्या नोंदी गावच्या कुलकर्ण्याने कराव्यात.

8) सरकारने कायदा करून शेतकऱ्यांमधील असंतोष कमी करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांची दुरावस्था दूर करण्यासाठी तगाईची सोय असावी व ठिकठिकाणी शेतकरी बँका स्थापन करण्यासंबंधी कमिशनने शिफारस केलेल्या होत्या. या उठावाचे पडसाद पुढे अनेक वर्षे उमटत राहिले.

## दखखनच्या दंग्यावरील मते

- **चाल्सवर्थ निल–** 'Myth of Deccan Riots'- फक्त सावकार जबाबदार नाही. ब्रिटिश महसुल व्यवस्था जबाबदार आहे.
- ▶▶ या काळात दुष्काळ पडले असताना सुध्दा टॅक्स दर बदलले नाहीत.
- ▶▶ टॅक्स न भरल्यामुळे जमिनी ताब्यात घेणे 'दखखनच्या दंग्यांना' कारणीभुत ठरल्या.
- **सर ऑक्लंड कॉलवील –**
- ▶▶ शेतकऱ्यांची पुर्वपार चालत आलेली कर्ज काढण्याची पध्दत व ते न फेडण्याची प्रवृत्ती उठावाला कारणीभुत धरली.
- ▶▶ शेतकरी व सावकार यांच्यातील संबंध बिघडले.
- प्रा. रविंद्र कुमार पुर्वी जमिन महसुलासाठी शेतकरी हा वैयक्तिकरित्या जबाबदार नसे. पाटील व संपूर्ण गाव जमिनमहसुलासाठी जबाबदार असे.
- **प्रा. एस. सी.लक्ष्मी लाल यांनी उठावाची कारणे पुढील प्रमाणे दिली आहेत:**
- ▶▶ महसूलाची आकारणी वाढीव दराने झाली
- ▶▶ शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढला.
- ▶▶ महसुलाची आकारणी वाढीव दराने झाली.
- ▶▶ शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढला.
- कॅटनेंचने या उठावाची तुलना 19 व्या शकतकामधील बंगाल व बिहारातील उठावाशी केली आहे. उदा. 1855 संताळ चा उठाव व 1871 ची खारवार चळवळ होत. 1875 ते 1900 या काळातील बिरसा चळवळीशीसुद्धा त्यांनी तुलना केली आहे. हा उठाव मध्यमवर्गीय शेतकऱ्यांनी केला आहे. उठावाची तुलना 19 व्या शतकातील बंगाल व बिहारातील उठावाशी केली.
- प्रो. रणजित गुहांच्या मते,- Elementery Aspects of Peasant insurgency in Colonial India- हा उठाव मुख्यतः शेतकऱ्यांनी आपले शोषण करणाऱ्यांच्या विरूद्ध केला नव्हता, तर सावकारांना निशस्त्र करणे हा त्यांचा प्रधान हेतू होता. त्यांनी सावकारांचे बॉन्डस व हिशोबाची कागदपत्रे जाळली, सन 1830 मध्ये इंग्लंडमधील झालेल्या डुलपस चळवळी सारखा हा उठाव होता.
- प्रो. ब्रम्हानंद हे म्हणतात की 1875 शेतकरी उठाव किंवा चळवळ यांचे स्वरूप मर्यादीत नव्हते. सन 1875 पूर्वी झालेल्या उठावाशी यांचा संबंध आहे. या उठावाला खेड्यातील सर्व जनतेनी पाठिंबा दिला. व काही वेळा सर्व जातीच्या लोकांनीही सक्रीय पाठिंबा दिला.
- **पुण्यातील सार्वजनिक सभेने या उठावाविषयी पुढील मुद्दे मांडले.**
- ▶▶ खेड्यामध्ये पूर्वी सहजा न दिसलेली एकी दिसून आली.
- ▶▶ हा उठाव पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा इ. जिल्ह्यात होता.
- ▶▶ ज्या ठिकाणी जमाबंदीचे नवे दर लागू केले होते तेथे मोठ्या प्रमाणात उठाव झाले.

# 5. दळणवळण

रेल्वे

रस्ते सुधारणा

तारा (टेलिग्राफ)

अंतर्गत जल व सागरी वाहतुक

हवाई वाहतुक

# 6. धार्मिक सुधारणा व चळवळ

## ब्राह्मो समाज

- **राममोहन बॅनर्जी ऊर्फ राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केली. वेद व उपनिषदे हे ब्राह्मो समाजाचा आधार होते.**

**ब्राह्मो समाजाचे तत्त्वज्ञान:**

- परमेश्वर एक असून एवेश्वरवाद हाच सत्याचा मार्ग आहे.
- सर्वधर्मीयांबद्दल बंधुभाव असावा.
- पूजा-अर्चा यांना विरोध करावा.
- व्यक्तीने प्रपंचास परमार्थरूप मानून प्रपंच चालवावा.
- प्रेम सेवा, परोपकार हाच धर्माचा खरा अर्थ होय, म्हणून एकमेकांशी व्यवहार करावा.
- ब्राह्मो समाजाचे कार्य

**ब्राह्मो समाजात फूट 1866:**

- देवेंद्रनाथ टागोरांच्या नेतृत्वाखाली आदी ब्राह्मो समाज
- केशवचंद्र सेनच्या नेतृत्वाखाली भारतीय ब्राह्मो समाज

**भारतीय ब्राह्मो समाजाचे कार्य / केशवचंद्र सेनचे कार्य:**

- स्त्री -सुधारणेला उत्तेजन देणे.
- शैक्षणिक सुधारणा व नैसर्गिक आपत्तीप्रसंगी आर्थिक पुरवठा
- सामाजिक सुधारणा

**भारतीय ब्राह्मो समाजात फूट:**

- केशवचंद्र सेनच्या नेतृत्वाखाली नवविधान पंथाची स्थापना.

**साधारण ब्राह्मो समाज :**

- शिवनाथ शास्त्री, आनंद बोस, शिवचंद्र बोस, उमेशचंद्र दास यांच्या नेतृत्वाखाली

## मानव धर्मसभा

- या सभेचा प्रार्थना दिवस रविवार होता.
- दादोबा पांडुरंग यांचे नोकरीनिमित्त काही काळ सुरत येथे वास्तव्य होते. तेथे त्यांचा दुर्गाराम) मंछाराम मेहता, दिनमणी शंकर दलपतराय, मोतीराम दलपतराय व दामोदर दास या तरुण मित्रांशी घनिष्ठ संबंध आला.
- त्या सर्वांनी मिळून 22 जून 1844 रोजी 'मानवधर्म सभा' या संस्थेची स्थापना वेली.
- या संस्थेचे अध्यक्ष म्हणून दादोबा पांडूरंग यांची तर कार्यवाह म्हणून दुर्गाराम मंछाराम यांची निवड झाली.

**सभेचे तत्वज्ञान :**

- ईश्वर एकच असून त्याची सर्वांनी भक्ती करावी.
- खरा धर्म हा ईश्वरनिष्ठेमध्ये आहे, निष्ठा ही प्रेम व नैतिक वर्तन यावर अवलंबून आहे.
- सर्व जगताचा एकच धर्म आहे. तो म्हणजे मानवधर्म होय.
- मनुष्याचे श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व गुणावरून ठरवावे, कुळावरून नव्हे.
- सर्वांनी विवेकाने वागावे.
- सर्वांना सन्मार्गाचे व सदाचाराचे शिक्षण द्यावे.
- परमेश्वर प्राप्तीसाठी भक्ती करावी.

**सभेचे ब्रीदवाक्य :**

- जातिभेद न पाळणे हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते.

## परमहंस सभा

- सभेचे अध्यक्ष : राम बाळवृष्ण जयकर
- अहमदनगर शाखेचे अध्यक्ष : कासिमभाई ढालवानी
- पुणे शाखेचे अध्यक्ष : केशवराव भवाळकर (सावित्रीबाई फुले यांचे शिक्षक)
- दादोबा पांडूरंग यांची 'मानवधर्म सभा' फार काळ चालली नाही तथापि तेवढ्यावरून नाऊमेद न होता.
- दादोबा पांडूरंग आणि त्यांचे काही सहकारी यांनी सन 1849 मध्ये मुंबई येथे 'परमहंस सभा' किंवा 'परमहंस मंडळी' नावाची दुसरी संस्था स्थापन वेली. या सभेच्या स्थापनेत दादोबा पांडूरंग यांचाच पुढाकार होता.
- भाऊ महाजन, आत्माराम पांडूरंग या सुधारकांचाही या संस्थेच्या स्थापनेस हातभार लागला.
- दादोबा पांडूरंग यांना या संस्थेला 'परमहंस' हा शब्द सुचविण्यामागे हंसाची उपमा लक्षात आली असावी, हंस ज्याप्रमाणे पाणी आणि दूध अलग करतो त्याप्रमाणे ही सभा कार्य करील अशी दादोबा पांडूरंग यांची कल्पना असावी.

**सभेची उद्दिष्टे :**

- जातिसंस्था नष्ट करणे. (जास्त भर)
- मूर्तिपूजेला विरोध करणे.
- पुनर्विवाहाला उत्तेजन देणे.
- स्त्री शिक्षणाला प्राधान्य देणे.
- दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे ही या संस्थेची प्रमुख उद्दिष्टे होती.
- दादोबा पांडूरंग यांनी या संस्थेच्या सभासदासाठी 'धर्म विवेचन' आणि 'परमहंसिक ब्रह्मधर्म' या दोन पुस्तिका लिहिल्या होत्या.

**संस्थेची कार्यपद्धती :**

- प्रार्थनेनंतर सर्व सभासद सहभोजन घेत. या सहभोजनाचे अन अस्पृश्य आचाऱ्याने बनविलेले असे. तसेच ख्रिस्ती माणसाने बनविलेला पाव खाल्याशिवाय आणि मुसलमान माणसाने आणलेले पाणी प्यायल्याशिवाय कोणालाही या सभेचे सभासद होता येत नसे; अशी माहिती परमहंस सभेचे एक सभासद डॉ. रामकृष्णपंत भांडारकार यांच्या एका भाषणात आढळते.
- अक्रुराने गोपिकास शिकवलेले ब्रह्मज्ञान – बाबा पदमनजी
- सभेवरती टीका (रामकृष्ण अनंत जोशी उर्फ गुजाबा जोशी) परमहंस मत प्रशंसा

**सभेच्या अपयशाचे कारण :**

- सभेचे बोजड तत्वज्ञान
- सभेचे कार्यातील गुप्तता व ख्रिस्ती वळणाचा दीक्षा विधी
- धैर्य, जबाबदारी व गांभीर्य या गुणांचा सभासदांमध्ये असलेला अभाव
- मर्यादित कार्यक्षेत्र

## इतर महत्वाचे

- 1853 – मधील गिरगावची सभा डॉ. रा.गो. भांडारकर यांच्या नेतृत्वात झाली.

## परमहंस सभेचे महत्वाचे सभासद

- **काही महत्वाचे :**
- ल.न. जोशी, ना.बा. पटवर्धन, बा. बा. भागवत – एल्फिस्टन स्कुल मुंबई
- केशवराव भवाळकर – पुणे

- वा.भी. करमरकर – सोलापूर
- बा.म. आदूरकर – नागपूर
- ना.रा. दातार–जमखंडी
- पु.ज. काणे, दीक्षित – रत्नागिरी
- विष्णुपंत जांभेकर – धुळे
- रामचंद्र गावडे – ठाणे
- अच्युत हरी – जमखंडी

## प्रार्थना समाज

- 1864 मध्ये ब्राह्मोसमाजाचे नेते केशवचंद्र सेन मुंबईत आले होते. ते समाज सुधारणेचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांनी मुंबईत दिलेल्या व्याख्यानांनी येथील समाजसुधारकांना नव्याने प्रेरणा मिळाली. त्यांनी आता धर्मसुधारणेचे व समाजसुधारणेचे कार्य नव्याने हाती घेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू वेल्या.
- त्याचा दृश्य परिणाम म्हणजे प्रार्थना समाजाची स्थापना होय. डॉ. आत्माराम पांडुरंग यांनी पुढाकार घेऊन 31 मार्च 1867 रोजी मुंबई येथे प्रार्थना समाजाची स्थापना वेली.
- सुरुवातीला या संस्थेला 'एकेश्वर भक्तमंडळी' असे नाव होते.
- डॉ. पांडूरंग यांच्याखेरीज दादोबा पांडूरंग, बामन आबाजी मोडक, न्या. चंदावरकर, न्या. म. गो. रानडे व डॉ. रा. गो. भांडारकर इत्यादी विचारवंतांचाही या संघटनेत सहभाग होता.
- डॉ. आत्माराम पांडूरंग हे या सभेचे पहिले अध्यक्ष बनले.
- 1868 साली केशवचंद्र सेन यांनी मुंबईला दुसरी भेट दिली व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन वेले. त्यामुळे प्रार्थना समाजाच्या कार्याला बळकटी आली.
- स्थापना – पापमोचनी एकादशीच्या दिवशी (31 मार्च 1867)
- 17 डिसेंबर 1866 (पहिली सभा झाली) आत्माराम पांडुरंग यांच्या घरी
- उपस्थित : बाळ मंगेश वागळे, नारायण महादेव परमानंद (मामा परमानंद), वासुदेव बाबाजी नवरंगे
- अनुपस्थित : दादोबा पांडुरंग तर्खडकर, राम बाळकृष्ण जयकर (स्वर्गवासी)
- डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांच्या नेतृत्वाखाली डॉ. रामकृष्ण भांडारकर, न्या. रानडे, दादोबा पांडुरंग, सर नारायण चंदावरकर, वामन मोडक यांनी प्रार्थन समाजाची स्थापना केली.

### प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान:

- परमेश्वर एक असून विश्वाचा निर्माता आहे.
- परमेश्वर जगनियंत्रक, अनंतरूपी, सर्वशक्तिमान, पापनाशक, पालनकर्ता असल्याने शरण गेल्यास इहलोकी सुख प्राप्त होते.
- परमेश्वराच्या प्रार्थनेमागे भौतिक फलाची अपेक्षा धरू नये.
- परमेश्वराची पूजा करणे अयोग्य आहे. कारण तो सगुण आहे.
- सर्व मानव परमेश्वराची लेकरे आहेत. सर्वांनी बंधुभावाने वागावे.

### प्रार्थना समाजाचे कार्य:

- 1876 मध्ये भिकोबा लक्ष्मण चव्हाणांनी मुंबईत पहिली रात्रशाळा चालू केली.
- 1875 मध्ये उमीया शंकर लालशंकर यांनी अनाथ मुलांसाठी पंढरपूरला अनाथाश्रम सुरू वेले. दुष्काळाची विविध कामे (1876–77) हाती घेऊन लोकांना मदत केली.
- प्रतापचंद्र मुजुमदारांनी व डॉ. सखाराम अर्जुन यांनी स्त्री शिक्षणासाठी धडपड केली.
- रानडेंनी 1882 ला पुण्यात मुलींची शाळा सुरू केली. पंडिता रमाबाईनी आर्य महिला समाज सुरू केला. प्रार्थना समाजाच्या महिला कार्यकर्त्यांनी मदत दिली.
- 1901 मध्ये सर नारायण चंदावरकरांची कन्या सौ. शिरूरने मुंबईत सामाजिक परिषदेचे अधिवेशन घेतले.

- विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' सुरू करून दलितांसाठी कार्य केले. 1901 मध्ये दलितांकरिता व्यापक कार्याची योजना केली.
- भिकोबा चव्हाणने वासुदेव बाबाजी नवरंगेशी काशीबाई या विधवेचा विवाह घडवला.
- डॉ. आत्माराम पांडुरंग व नारायण महादेव परमानंद यांनी स्त्रीचे विवाहाचे वय 20 असावे हे स्पष्ट वेले.
- जनसामान्यांचा नैतिक स्तर उंचावण्यासाठी 'ब्राह्मो पोस्टल मिशन' व 'संगतसभा द्वारा प्रयत वेले. संत तुकारामांच्या गाथा गायनातून धार्मिक-सामाजिक प्रबोधन केले.

## इतर महत्वाचे

- प्रार्थना समाजास 'जुन्या भागवत धर्माची शाखा' कोण म्हणत – न्या. रानडे.
- प्रार्थना समाजास घोषवाक्य – न्या. रानडेंनी दिले. – 'Love of God, in the Service of Man'

## सत्यशोधक समाज (24 सप्टेंबर 1873)

- सत्यशोधक शब्द – बाबा पदमनजी यांच्या कडून आला. – काही इतिहास करांचे मत
- 1872 – गुलामगिरी हा ग्रंथ लिहिला. – अमेरिकन निग्रोना अर्पण
- एकमय लोक – संकल्पना – महात्मा फुलेंनी वापरली.

### प्रेरणा :

- ज्ञानगीरी बुवा
- कबीराच्या 'बिजक' ग्रंथातील विप्रमती प्रकरणाचा प्रभाव :
- वज्रसुचीच्या ग्रंथाचा प्रभाव
- प्रमाणग्रंथ – सार्वजनिक सत्यधर्म

### स्थापनेत उपस्थित सदस्य :

- ज्ञानगिरी बुवा (मराठवाडा), धोंडीराम कुंभार, रामशेठ उरवणे, बापूजी हरी शिंदे विदर्भ, ग्यानोबा झगडे, रामचंद्र भालेकर, कृष्णराव भालेकर, तुकाराम हणमंता पिंजन इ. सहकारी उपस्थित होते.
- घोषवाक्य : सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्थी।।
- पहिले अध्यक्ष – जोतीराव फुले
- कोषाध्यक्ष – जोतीराव फुले
- पहिले कार्यवाहक – नारायण गोविंद कडलक

### सत्यशोधक समाजाची मुख्य तत्त्वे :

- 'ईश्वर एकच असून तो निर्गुण-निराकार आहे.' सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.
- परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवाला अधिकार आहे.
- परमेश्वराची भक्ती करण्यास मध्यस्थाची गरज नाही. तेव्हा कोणत्याही व्यक्तीला पुरोहित वर्गाच्या मध्यस्थीविना आपल्या प्रिय परमेश्वराची उपासना करता येते. माणसाला जातीने नव्हे तर गुणांनी श्रेष्ठत्व प्राप्त होते.
- पुनर्जन्म, कर्मकांड, जपजाप्य इ. गोष्टी अज्ञान मूलक आहेत व त्या कनिष्ठ वर्गाच्या पिळवणुकीचे कारण आहेत.
- कोणताही धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित नाही. सर्व धर्मग्रंथाची निर्मिती मानवानेच केली आहे.
- फुलेंच्या निधनानंतर 24 मे 1891 सत्यशोधक समाजाचे नामांतर 'सत्यधर्म समाज' असे करण्यात आले.
- अध्यक्ष – विश्राम रामजी घोले.
- चिटणीस – हरिचंद्र नवलकर
- वृत्तपत्र – सत्यप्रकाश
- भालेकर व लोखंडे या कामात सहभागी झाले नाहीत.

- वेदोक्त प्रकरणानंतर ढवळलेले कोल्हापूर जिल्ह्यामध्ये 1911 साली सत्यशोधक समाज पुन्हा एकदा रुजवण्याचा प्रयत झाला.
- 11 जानेवारी 1911 – दिगंबर जैन बोर्डिंग मधील चतुराबाई हॉल मध्ये शाहुंच्या प्रेरणेने समाज पुर्नरुज्जीत झाला.
- कार्यक्रमाचे अध्यक्ष – परशुराम घोसरवाडकर
- स्थापन झालेल्या समाजाचे अध्यक्ष – भास्करराव जाधव
- उपाध्यक्ष – अण्णासाहेब लठ्ठे
- कार्यवाहक – हरिभाऊ चव्हाण

**तत्वे :**

- **जोतीरावांच्या मृत्युनंतर 1911 साली सत्यशोधक समाजाचे ठराव प्रसिद्ध :**
  1) सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत व देव त्यांचा आईबाप आहे.
  2) आईला व बांधवांना भेटण्यास प्रसन करण्यास मध्यस्थीची गरज नसते, त्याप्रमाणे देवाला प्रसन करण्यासाठी पुरोहित किंवा गुरू ह्यांची आवश्यकता नाही.
  3) हे तत्त्व मान्य असल्यास कोणालाही सभासद होता येते.
- पहिले अधिवेशन – पुणे स्वामी अय्यावरू (मुंबई सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष)
- उपस्थित मंडळी – विठ्ठलराव ढोणे, श्रीपतराव चव्हाण, गोविंदराव जाधव
- अधिवेशन – 1912 साली सत्यशोधक समाजाचे दुसरे अधिवेशन पार पडले. – नाशिक – संतुजी लाड
- सासवड अधिवेशन – 1914 सावित्रीबाई रोडे (विद्यादेवी), क्षत्रिय रामोशी–वृत्तपत्र

## धर्मसुधारणा चळवळी

| क्र. | समाजाचे नाव | संस्थापक | प्रेरणा | संबंधित व्यक्ती | इतर महत्वाचे | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | ब्राम्हो समाज (1828) | राजा राममोहन रॉय | ब्राम्हसभा ब्राम्हो समाज | द्वारकानाथ टागोर, ताराचंद चक्रवर्ती कालीनाथ रॉय, रामचंद्र विद्याबगीश देवेंद्रनाथ टागोर, आचार्य वेशवचंद्रसेन पंडित शिवनाथ शास्त्री, आनंद मोहन बोस, हेमेंद्रनाथ टागोर, शशिपाद बॅनर्जी | धर्मसभा–राजा राधाकांत देव यंग बंगाल – हेन्री डोरॅजिवो | Friends of Rajaram Mohanroy – चार्ल्सडाल |
| 2. | मानवधर्म सभा (1844) | दादोबा पांडुरंग तर्खडकर | हेन्री ग्रीन | दुर्गाराम मंछाराम, दिनमणी शंकर दलपतराय, मोतीराम दलपतराय, दामोदर दास | 'धर्मविवेचन' एक जगदासी आर्य | कार्यवाहक – दुर्गाराम मंछाराम |
| 3. | परमहंस सभा (1849) | दादोबा पांडुरंग तर्खडकर | ईश्वरचंद विद्यासागर | राम बाळकृष्ण जयकर (अध्यक्ष) बाबा पदमजी, कासिमभाई ढालवाणी, शाहूराव कुकडे, सखाराम शास्त्री, लक्ष्मण शास्त्री हळबे. | गुप्त सभा होती | अहमदनगर शाखेचे अध्यक्ष – कासिमभाई ढालवाणी |
| 4. | प्रार्थना समाज (1867) | आत्माराम पांडुरंग तर्खडकर | केशवचंद्र सेन | मामा परमानंद, बाळ मंगेश वागळे, वामन दाजी मोडक, वासुदेव नवरंगे, न्या.रानडे, लालशंकर उमीयाशंकर, वि.रा. शिंदे, चंदावरकर, भांडारकर, गंगुताई भंडारे, रमाबाई रानडे | सत्यमेव जयते | एकेश्वर भक्तमंडळी |

| क्र. | समाजाचे नाव | संस्थापक | प्रेरणा | संबंधित व्यक्ती | इतर महत्वाचे | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5. | सत्यशोधक समाज (1873) | महात्मा पुले | ज्ञानगिरी बुवा | रामशेठ उरवणे, नारायण कडलग, भालेकर, ना.मे. लोखंडे, व्यंकू कालेवार, स्वामी अय्यावरु, पोलीसानी लिंगू, भास्करराव जाधव, विश्रामरामजी घोले, हरिभाऊ चव्हाण, सदाशिव राव गोवंडे, ग्यानोबा ससाने, कोंढाजी डुबरे पाटील | सार्वजनिक सत्यधर्म कबीर–बिजकग्रंथ – विप्रमती वर्जसुची– तुकाराम तात्या– पडवळ –सर्व साक्षी जगत्पती त्याला नकोच मध्यस्थी | |
| 6. | आर्यसमाज (1875) | स्वामी दयानंद सरस्वती | स्वामी विरजानंद | लोकहितवादी, शाहू महाराज, स्वामी श्रध्दानंद, लाला लजपतराय, न्या. रानडे | सत्यार्थ प्रकाश, भारत भारतीयांसाठी स्वराज्य आणि नमस्ते बंगालची फाळणी मोपला उठाव | 1875 – मुंबई 24 जून 1877 – लाहोर |
| 7. | थिओसॉफिकल सोसायटी (1875) | मॅडम ब्लावाटस्की, ऑलकॉट | | ॲनी बेझंट, ॲलन ह्युम, बी.पी.वाडिया | सत्यान्नास्ति परो धर्म | |
| 8. | रामवृष्ण मिशन (1897) | स्वामी विवेकानंद | | | आत्मो मोक्षार्थम जगद हितयच | |

# 7. शिक्षण

## भारतातील शिक्षणाचा क्रम

| | | |
|---|---|---|
| मदरसा (1781) रॉयल एशियाटीक सोसायटी (1784) बनारस संस्कृत कॉलेज (1791) फोर्ट विल्यम कॉलेज (1800) हेलबरी कॉलेज (1806) चार्टर ॲक्ट (1813) | मेकॉले समिती (1835) वुड्सचा खलिता (1854) स्टॅनले वालपार्ट (1856) हंटर कमिशन (1882) रॅले कमिशन (1902) विद्यापीठ कायदा (1904) | सॅडलर कमिशन (1917) अलिगड विद्यापीठ (1920) हार्टोग कमिशन (1929) वर्धा योजना (1936) सार्जेंट योजना (1944) |

## महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्था

### अमेरिकन मिशनरी

- सम्युअल मिल
- आशियातील लोकांना शिक्षणाच्या अंध:कारातुन दुर करण्याची जबाबदारी घेतली.
- 1813 – सॅम्युअल मिलने 2 जण पाठवले.
- गार्डन हॉल, नॉट – 1815 ला शाळा स्थापण – अमेरिकन मिशन चर्च
  - मुंबई
  - धर्मप्रसार, शिक्षण
  - समाजसेवा
- 1715 –रिचर्ड कॉबने इंग्रजी शाळा काढली.
- अमेरिकन मिशन चर्च – रिचर्ड कॉब – इंग्रजी शाळा (बॉम्बे एज्युकेशन सोसायटीने ताब्यात घेतल्या.)

### बॉम्बे एज्युकेशन सोसायटी (1815)

- अध्यक्ष – जॉर्ज बर्ग्ज
- संस्था स्थापनेस प्रोत्साहन – एलफिस्टन
- अमेरिकन मिशनरीची संस्था
- Society for Promoting Education among Poors within Government of Bombay
- संस्थापक – इवान नेपिअर

### स्कॉटिश मिशन सोसायटी

- 1828 ला रे जॉन विल्सन आणि पत्नी मागरिट विल्सन यांनी स्वत:च्या घरी मुलीसाठी शाळा काढली. – विल्सन स्कुल
- 1832 अंब्रोली स्कुल (गिरगाव)
- 1836 विल्सन कॉलेज/ इन्स्टिट्युट मध्ये रुपांतर
- 1861 – फ्री जनरल एज्युकेशन इन्स्टिट्युट – भारतातील पहिली खासगी आणि Non Govt. Institute.
- जॉन विल्सन – मुंबई विद्यापीठ संस्थापक
- Caves of Kerala - Book
- Bombay Asiatic Society (1804)
- पहिले अध्यक्ष – जोर्ज मॉर्कित्न्स
- एकमेव भारतीय अध्यक्ष – न्या. के.टी.तेलंग

## चर्च मिशन

- इंग्लंड मिशनरी
- भारतात सर्वात जास्त शाळा.
- संस्थापक चार्ल्स ग्रँट – भारतातील इंग्रजी शिक्षणाचा जनक
- 1813 चार्टर ॲक्ट – 1 लाख रुपये मागणी – चार्ल्स ग्रँट आणि विल्बर फोर्ल्स
- 1837 – रॉबर्ट मनी हायस्कूल

## बॅप्टीस्ट मिशन (कलकत्ता)

- विल्यम कॅरे
- 1800 मध्ये सेरामपुर येथे भारतात आला.
- 1800 मध्ये फोर्ट विल्यम कॉलेज येथे प्राध्यापक.
- विल्यक कॅरेला मराठी शिकवणारे –वैद्यनाथ शास्त्री
- संस्कृत शिकवणारे – मृत्युजय विद्यालंकार
- बंगाली शिकवणारे – रामराम बसु
- पुस्तके : Grammer of Maratha Language (1805) मराठीतील पहिले मुद्रित पुस्तक
- Dictionary of Maratha Language (1810)
- मराठी भाषेत बायबल भाषांतर

## मुंबई शिक्षण

- 1820 साली भारतीय मंडळींना शिक्षण देण्यासाठी शाळा स्थापन करा यासाठी सभा बोलावली, सभेला उपस्थित नाना शंकरशेठ आणि जमशेठजी जीजीभॉय उपस्थित होते.
- 21 ऑगस्ट 1822 – Bombay Native School Book & School Society (मुंबई हैंद पाठ्यपुस्तक मंडळी)
- अध्यक्ष/प्रोत्साहन : एल्फिनस्टन
- विश्वस्त : मंगलदास नथुभाई, सोराबजी शापुरजी, जमशेठजी जीजीभाई, नाना शंकरशेठ
- Seretary : सदशिव काशिनाथ छत्रे, व्यंकोजी सदशिव नाईक
- शालेय पुस्तके :
- प्रकाशन अध्यक्ष: जॉर्ज जर्वीस
- भारतीय सदस्य : सदाशिव काशिनाथ छत्रे, हरि केशवजी पठारे, जगन्नाथ शास्त्री क्रमवंत
- वरील सोसायटीचे रुपांतर Bombay Native Education Society सदाशिव छत्रेंनी राजीनामा दिल्यानंतर बाळशास्त्री जांभेकर त्याजागी आले.

- **1824 साली एल्फिनस्टन याने शिक्षण धोरण जाहीर केले. – एलफिन्स्टन मिनिट्स**
- भारतीयांना प्राच्य शिक्षण देण्यात यावे.
- तळागाळातील लोकांना शिक्षण देण्यात यावे.
- शासनाने शिक्षणाकडे आणि भाषांतराकडे लक्ष द्यावे.
- पाठ्यपुस्तके पुरवली जावीत.
- एलफिन्स्टनच्या वरील धोरणाला फ्रान्सिस वार्डीन याने विरोध केला.
- भारतीयांना शिक्षण देणे ही ब्रिटिशांची जबाबदारी नाही.
- एलफिन्स्टनच्या निवृत्ती सोहळ्यात एल्फिनस्टन स्कूल ची स्थापना – 1827

- एल्फिनस्टन फंड उभारला गेला.
- कार्यक्रम अध्यक्ष – जॉर्ज माल्कम
- एल्फिनस्टन कॉलेजची स्थापना : या कॉलेजच्या प्राध्यापक पदी प्रा. ऑर्थर ऑर्बेल आणि प्रा. हॅकनेस यांची तर मराठी प्रा. जांभेकर यांची नियुक्ती.
- 1853 – Board of Education अध्यक्ष – जॉर्ज वॉर्डिन
- 1854 – वुड्सच्या खलित्यामध्ये Board of Education बरखास्त करुन लोकशिक्षण विभागाची स्थापना करण्यात आली.
- चार्ल्स वुडच्या कमिशनच्या शिफारशीनुसार लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर Bombay Association च्या मागणीने मुंबई विद्यापीठाची स्थापना.

### पुणे शिक्षण व्यवस्था

- दक्षिणा प्राईझ फंड बरखास्त करुन पुण्यामध्ये 1821 ला पुणे संस्कृत पाठशाळा/हिंदु कॉलेज, पुना कॉलेज/डेक्कन कॉलेज स्थापन केले.
- डेक्कन कॉलेज पहिले प्राचार्य – मेजर कँडी – मराठी भाषेला विरामचिन्ह दिले.
- 1832 पुण्यातील पहिली शाळा इंग्रजी मेडियम जेम्स मिशल यांनी काढली. नंतर ही शाळा डेक्कन कॉलेज मध्ये विलीन झाली.
- 1848 – मुलींची पहिली शाळा.
- 1 जानेवारी 1860 – Poona Native Institution स्थापना (भावे हायस्वुल) वासुदेव बळवंत फडके, वा.पा. भावे, इंदापुरकर
- महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी रुपांतर
- 1 जानेवारी 1880 – न्यु इंग्लिश स्कुल – लोकमान्य टिळक
- 2 जानेवारी 1885 – फर्ग्युसन कॉलेज – जेम्स फर्ग्युसन यांच्या नावाने
- एस.पी. कॉलेज (न्यु पुना कॉलेज) (1916)
- डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी – गंगाराम म्हस्के
- रयत शिक्षण संस्था (1919) – कर्मवीर भाऊराव पाटील
- हुजुरपागा
- संस्कृत कॉलेज, पुणे (1821) – एल्फिनस्टन
- एल्फिन्स्टन मुंबई, – 1827
- Grand Medical College, Mumbai (1845)

### विदर्भातील स्त्री शिक्षण

- 1892 – अमरावतीच्या यशोदाबाई जोशींनी स्त्रियांमध्ये जागृती घडवुन आणण्यासाठी 'वनिता समाजाची' स्थापना केली.
- 1907 – दलित मुलींच्या शिक्षणासाठी किसन फागोजी बनसोडे यांनी 'चोखामेळा कन्याशाळा' सुरु केली.
- या कामात त्यांना जईबाई चौधरी व आदिवासी महिला झुलाबाई यांचे सहकार्य लाभले.
- 1914 – सोनुताई सुळे व त्यांची बहिण द्वारकाबाई प्रधान यांनी नागपुरला **'सुळे महाविद्यालयाची'** स्थापना केली.
- 1924 – नागपुर येथील नवी वस्ती येथे जईबाईनी 'चिखामेळा कन्याशाळा' सुरु केली.

## बहुजन समाजासाठी शिक्षणाचे प्रयत्न

### डेक्कन मराठा एज्युकेशन (1885)

- गंगाराम भाऊ म्हस्के असोशिएशन
- 1885 : डेक्कन असोशिएशन नावाच्या संस्थेची स्थापना
- उद्देश : मराठा वर्गात शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, होतकरु विद्यार्थ्यांस शिष्यवृत्या द्याव्यात, आर्थिक मदत करावी

## कर्मवीर भाऊराव पाटील

- कमवा आणि शिका
- दुधगाव विद्यार्थी आश्रम
- 1919 – कराड – काले रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.
- 1924 – शाहु बोर्डींग हाऊस
- 1935 – शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी – सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग सेमर
- देशातील पहिले ग्रामीण अध्यापक विद्यालय – रुरल ट्रेनिंग कॉलेज ग्रामीण अध्यापक विद्यालय

### शाहू महाराजांनी सुरु केलेली वसतिगृहे

| क्र. | वसतिगृहाचे नव | समाज | स्थापना |
|---|---|---|---|
| 1 | सर्व जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह | - | 1896 |
| 2 | व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग | मराठा | 18 एप्रिल 1901 |
| 3 | दिगंबर जैन बोर्डिंग | जैन | 1901 |
| 4 | वीरशैव लिंगायत वसतिगृह | लिंगायत | 1906 |
| 5 | किंग एडवर्ड मोहमेडन वसतिगृह | मुस्लिम | 1906 |
| 6 | मिस क्लार्क होस्टेल | अस्पृश्य | 14 फेब्रु. 1908 |
| 7 | देवज्ञ शिक्षक समाज बोर्डिंग | देवज्ञ | 24 डिसेंबर 1908 |
| 8 | श्री नामदेव बोर्डिंग | शिंपी | 2 एप्रिल 1911 |
| 9 | पांचाळ ब्राह्मण वसतिगृह | ब्राह्मण | 1912 |
| 10 | श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह | ब्राह्मण/ सारस्वत | 20 मे 1915 |
| 11 | इंडियन ख्रिश्चन होस्टेल | ख्रिश्चन | 7 जून 1915 |
| 12 | रावबहादूर सबनीस प्रभू होस्टेल | प्रभू | सप्टेंबर 1915 |
| 13 | आर्य समाज गुरुकुल | आर्य | 18 मार्च 1918 |
| 14 | वैश्य बोर्डिंग | वैश्य | 1918 |
| 15 | वूड हाऊस वसतिगृह | आर्य | 1918 |
| 16 | ढोर-चांभार बोर्डिंग | ढोर चांभार | 1919 |
| 17 | उदोजी मराठा विद्यार्थी वसतिगृह | मराठा | 15 एप्रिल 1920 |
| 18 | श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस | गरिबांसाठी | 1 जुलै 1920 |
| 19 | शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह | -- | 6 जुलै 1920 |
| 20 | सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग | -- | 16 ऑगस्ट 1920 |
| 21 | सुतार बोर्डिंग | सुतार | 6 जुन 1921 |
| 22 | नाभिक विद्यार्थी वसतिगृह | नाभिक | 24 जुलै 1921 |
| 23 | शिवकंठी शेष समाज बोर्डिंग | नाभिक | 1921 |
| 24 | श्री देवांग बोर्डिंग | -- | - |

### राजर्षी शाहू महाराजांनी भूषविलेली अध्यक्षपदे व परिषदा

| दिनांक | कार्यक्रम/परिषद |
|---|---|
| नोव्हेंबर 1895 | शिवाजी निधी समितीचे अध्यक्ष |
| 28 नोव्हेंबर 1917 | 'मराठा शिक्षण परिषदेचे अध्यक्ष' (खामगाव) |
| 24 नोव्हेंबर 1918 | 'पीपल्स युनियन सभेचे अध्यक्ष' (मुंबई) |
| 14 डिसेंबर 1918 | 'आर्य धर्म परिषदे'च्या 11 व्या अधिवेशनाचे अध्यक्ष (नवसारी) |
| 19 एप्रिल 1919 | 'कुर्मी क्षत्रिय परिषदे'च्या 13 व्या परिषदेचे अध्यक्ष (कानपूर) |
| 7 मार्च 1920 | 'आर्य समाज परिषदेचे' अध्यक्ष (भावनगर) |
| 30 मे – 1 जून 1920 | 'अस्पृश्यता निवारण परिषदेचे' अध्यक्ष (नागपूर) |
| 27 जुलै 1920 | 'कर्नाटक ब्राह्मणेतर समाज परिषदेचे' अध्यक्ष (हुबळी) |
| 3 ऑक्टोंबर 1920 | 'शिवाजी सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे' अध्यक्ष (पुणे) |
| 16 फेब्रुवारी 1922 | तिसऱ्या 'अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेचे' अध्यक्ष (दिल्ली)<br>डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे पदसिद्ध अध्यक्ष |



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर

- 1924 – बहिष्कृत हितकारणी सभा
- उद्देश – वसतीगृहे उघडुन दलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे.
- 1928 – दलितवर्ग शिक्षण संस्थेची स्थापना (Dipressed Classes Education Society)
- 1945 – पीपल्स एज्युकेशन सोसायटी ची स्थापना.
- 1953 – सिध्दार्थ वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय सुरु केले.

## पंजाबराव देशमुख

- 1928 – जिल्हा कौन्सिल शिक्षक संघाच्या ठरावावरुन पंजाबरावांनी शिक्षकांना कार्यालयीन प्रवास भत्ता देण्यास सुरुवात केली.
- 1946 – श्री शिवाजी शिक्षण संस्थेची निर्मिती केली. – विदर्भातील पहिले खाजगी महाविद्यालय उघडण्यात आले.
- 1950 – श्री शिवाजी लोकविद्यापीठाचे – राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते उद्घाटन झाले.
- ब्रिदवाक्य – तमसो मा ज्योतिर्गमय

## अनुताई वाघ

- कोसबाड – नुतन बालशिक्षा केंद्राच्या चिटणीस
- शिक्षक – पालक प्रबोधनासाठी – शिक्षणपत्रिका
- स्त्री जागृतीसाठी – सावित्रीचे संपादन केले.

## बापुजी साळुंखे (गोविंदराव नानोजी साळुंखे)

- स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना.

## गुरुवर्य बाबुराव जगताप

- शिक्षकांच्या अडचणी दुर करण्यासाठी 1922 शिक्षक मासिक सुरु केले.
- 1914 – श्री शिवाजी मराठा स्कुल ची स्थापना.

**आदिवासींच्या संदर्भत कार्य करणाऱ्या व्यक्ती**

## बाळासाहेब खेर

- जिल्हाधिकारी डी. सिमिंग्टन यांच्या नेतृत्वाखाली आदीवासींच्या स्थितीची पाहणी करुन अहवाल सादर केला.ठा वर्गात शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, होतकरु विद्यार्थ्यांस शिष्यवृत्या द्याव्यात, आर्थिक मदत करावी.

## शामराव व गोदावरी परुळेकर

- किसान सभेच्या माध्यमातुन वारली समाजात जागृती.
- उंबरगाव (ज़री) – आदीवासी परिषदेत वेठबिगारी नष्ट करण्याचे अहवाल वेले.
- वारली शेतकरी उठावावर जेव्हा माणुस जागा होतो कादंबरी लिहली.

## ताराबाई मोडक

- तांत्रिक व्यावस्यिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न
- आदीवासींच्या मुलांसाठी अंगणवाड्या सुरु केल्या.
- कोसबाड येथे शैक्षणिक कार्यास सुरुवात.
- प्रत्यक्ष कार्यातुन शिक्षण, कुरण शाळा प्रयोग

## अनुताई वाघ (पद्मश्री, महाराष्ट्र शासनाचा दलितमित्र पुरस्कार)

- कोसबाड प्रकल्प – आदीवासींच्या उन्नतीसाठी
- पाळणाघरे, बालवाड्या, प्राथमिक शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालसेविका ट्रेनिंग कॉलेज
- **कोसबाडच्या टेकडीवरुन ग्रंथ लिहला.**

## दामुअण्णा टोवेकर

- हिंदु सेवा संघाची स्थापना
- **बीड (डोमरी) – सोनदरा गुरुकुल योजना**

## कॉ. रेवजी पांडुरंग चौधरी

- आदीवासी सेवा मंडळ – **शैक्षणिक कार्यास सुरुवात.**
- जव्हार संथान – वेठबिगारी पध्दत बंद करुन पहिला विजय
- जव्हार येथे – खरेदी विक्री संघाची स्थापना केली.

## पांडुरंग ढवळा साबळे

- 1951 – ॐ आदिशक्ती आदीवासी सेवा संघाची स्थापना.
- आदीवासींच्या स्वतंत्र राज्याची मागणी केली. – बाळासाहेब खेर यांच्याकडे.
- आदीवासी सेवा मंडळ – स्थापन करुन – आदीवासींच्या मुलांसाठी रात्रीच्या शाळा सुरु केल्या.
- आदीवासी कल्याण केंद्र महाराष्ट्र – सामाजिक व आर्थिक जागृती

## बापुराव कृष्णाजी देशमुख

- आदीवासी समाजातील भगत आणि भोंदुगीरीवर सर्वप्रथम हल्ला.
- यांच्या भुमिकेतुन – अखिल भारतीय आदीवासी परिषद स्थापन केली.

## रामराव वाडिवे

- आदीवासी सेवा सुधार समितीची स्थापना
- आदीवासी तरुणांमध्ये वाचनाची व शिक्षणाची आवड निर्माण केली.

## श्रीमंतराव विश्वेश्वरराव धर्मराव आत्राम महाराज

- राजे धर्मराव शिक्षण मंडळाची स्थापना
- गोंडवाना – नियतकालीकाचे संपादकत्व
- अल्पबचत, कुटुंबनियोजन, व्यवसंमुक्ती, पर्यावरण, समता, स्वातंत्र्य, बंधुप्रेम या संदर्भात कार्य केले.

## बाबुराव नारायण महावी

- आदीवासी विकास महामंडळाची स्थापना केली.

## महादेव गोपाळ कडु

- ठाणे जिल्हा प्रशिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना
- आदीवासी समाजोन्नसी संघाची स्थापना

## ब्रिटिश प्रशासन, जमिन महसुल पध्दत, शिक्षण, मुद्रण व वृत्तपत्रे, ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य, रेल्वे पोस्ट, तारायंत्र (प्रश्न आणि उत्तरे)

1. जातीअंतर्गत समस्या सोडविण्यासाठी पेशवे कालखंडात कोणती संस्था अस्तित्वात होती **– गोतसभा**
2. पण कोण लक्षात घेतो ही कादंबरी कोणाची आहे. **– ह. ना. आपटे**
3. केशवपन करणे हा गुन्हा असल्याचा कायदा कोणत्या वर्षी झाला **– इ. स.1856**
4. 1829 मध्ये कोणी सतीची पद्धत बंद केली **– लॉर्ड बेंटिंग**
5. सती न जाणाऱ्या विधवा स्त्रियांना मासिक किती रुपये महिना ब्रिटिशांनी दिल्याची नोंद आहे **– 7 रूपये**
6. इ.स. 1853 मध्ये मुंबई शहरात गौड सारस्वत जातीतला पहिला पुनर्विवाह कोणाचा झाला. **– रघुनाथ जनार्दन आणि विधवा चिमाबाई**
7. बंगालमध्ये कोणत्या समाजसुधारकाने विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाचा हक्क मिळवून देण्यासाठी मोठी चळवळ उभी केली होती **– ईश्वरचंद्र विद्यासागर**
8. मुंबई शहरात प्रचलित असलेली स्वतःला गळ टोचून घेऊन टांगून घेण्याची विचित्र पद्धत ब्रिटिशांनी कोणत्या वर्षी बंद केली **– इ. स.1856**
9. किती रुपयांचे टपाल तिकीट लावून भारतात कोठेही पत्र पाठविण्याची सुविधा ब्रिटिशांनी सुरू केली **– अर्धा आणा**
10. 'नाना फडणीसबरोबर मराठेशाहीतील शहाणपण लयास गेले.'; असे कोणी म्हटले होते **– पामर (इंग्रज अधिकारी)**
11. पुण्याच्या शनिवारवाड्यावर मराठ्यांचे भगवे निशाण उतरवून युनियन जॅक फडकावण्याचे काम कोणत्या चित्पावन ब्राह्मणाने केले **– बाळाजी नातू**
12. 1 जानेवारी 1818 रोजी इंग्रज सैन्य व मराठा सैन्य यांच्यात कोठे लढाई झाली **– भीमा कोरेगाव**
13. 10 एप्रिल 1818 रोजी प्रतापसिंहाची साताऱ्यामध्ये राजा म्हणून पुर्नस्थापना केल्यावर कोणाची ग्रँट डफचा पोलिटिकल एजंट म्हणून नियुक्ती करण्यात आली **– जेम्स कॅनिंगहॅम**
14. History of Marathas हा ग्रंथ कोणी लिहला **– ग्रँट डफ**
15. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने सातारा राज्य निर्माण केल्यावर पहिले तीन रेसिडेंट म्हणून कोणी काम पाहिले **– ग्रँट डफ – (1818–22), जॉन ब्रिग्ज – (1822–27), रॉबर्टसन (1827–39)**
16. कोणत्या वर्षी दत्तक वारसा नामंजूर करून डलहौसीने ते राज्य ब्रिटिश साम्राज्यात विलीन केले **– इ. स. 1847**
17. इ.स. 1786–1818 च्या मराठ्यांच्या ऱ्हासाच्या काळात पुणे दरबारात कोणते चार वकील वास्तव्याला होते **– सर चार्लस मॅलेट (इ.स. 1786–1797), कर्नल विलियम पामर (इ.स.1798–1801), सर बॅरी क्लोज (इ.स. 1801–1810), माउंट स्टुअर्ड एलफिन्स्टन (इ.स.1811–1819)**
18. इंग्रजांचा वकील पुण्याच्या दरबारी असावा ही मागणी प्रथम कोणी केली **– नाना फडणवीस**
19. इ.स. 1819 ते 1827 या काळात मुंबई इलाख्याचा पहिला गव्हर्नर कोण होता **– माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन**
20. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने कोण कोणते ग्रंथ लिहले **– काबूलचा इतिहास, भारताचा इतिहास, पूर्वेकडील देशांत ब्रिटिश सत्तेचा उदय**
21. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन नंतर कोणत्या गव्हर्नरनी मुंबई इलख्याचा कारभार पाहिला **– 1) सर जॉन माल्कम 2) थॉम्स मन्रो 3) चॅप्लिन 4) रॉबर्टसन 5) ग्रँट 6) पॉन्टिजर**
22. निवृत्तीनंतर इ.स. 1829 मध्ये व 1834 मध्ये दोन वेळेस त्याला गव्हर्नर जनरल हे भारतातील सर्वोच्च पद देण्याचे इंग्लंड सरकारने ठरविले होते; पण कोणी ते स्वीकारले नाही. **– माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन**
23. जमीन महसुलासाठी दुसरा बाजीराव पेशवा याच्या काळात कोणती पद्धत होती **– मक्ता पद्धत**
24. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या निवृत्तीनंतर मुंबई प्रांतात जमीन महसुलाची कोणती पद्धत सुरू झाली **–रयतवारी**

25. इ. स.1755 पर्यंत कोणत्या खात्यामार्फत मुंबई प्रेसिडेन्सीचा कारभार चालत होता **– Public Department**

26. मुंबई प्रांताचा दुसरा गव्हर्नर जॉन माल्कमने कोणते ग्रंथ लिहिले
**– Political History of India आणि मेमॉअर्स ऑफ सेंट्रल इंडिया**

27. थॉमस मन्रो यांनी मुंबई व मद्रास प्रांतात जमीन महसुलाची कोणती पद्धत सुरू केली **– रयतवारी पद्धत**

28. रयतवारी पद्धतीचा पहिला प्रयोग ब्रिटिशांनी कोणत्या ठिकाणी केला **– इंदापूर, पुणे**

29. एलफिस्टनने Bombay Education Society ची स्थापना कोणत्या वर्षी केली **– इ. स. 1815**

30. मुंबई प्रांतातील इनाम जमिनीची मालकी व शेतसारा माफी याची चौकशी करण्यासाठी मुंबई सरकारने कोणत्या वर्षी इनाम कमिशन नेमले **– इ. स.1852**

31. इ. स. 1820 मध्ये Society for the promotion of the Education of Poor ही संस्था देशी भाषेतून शिक्षण घेण्यासाठी कोणी सुरू केली **– एलफिस्टन**

32. शिक्षणासाठी निधी जमा करण्यासाठी The Bombay Native & School Book Society ची स्थापना कोणत्या वर्षी झाली
**– इ. स. 1822**

33. पेशवाई समाप्तीमुळे उच्चवर्गीय ब्राह्मणातील असंतोष दूर करण्यासाठी एल्फिन्स्टनने इ . स .1821 मध्ये पुण्यात कोणते कॉलेज स्थापन केले **– संस्कृत कॉलेज**

34. इ. स.1851 मध्ये संस्कृत कॉलेजचे नाव काय केले **– पुना कॉलेज**

35. मुंबईला ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना कोणत्या वर्षी झाली **– इ. स. 1845**

36. ब्रिटिश सरकारने Bombay Native Education Society चे कार्य व सरकारी शाळांचे कार्य यांचे एकत्रित करून कोणती संस्था स्थापन केली **– Board of Education (इ. स.1840)**

37. 1824 मध्ये मुंबई इलाख्यात मुलींची पहिली शाळा कोणत्या मिशनने सुरू केली **– अमेरिकन मिशनरी सोसायटी**

38. युरोपचे एका चांगल्या ग्रंथालयातील एका अलमारीचा एक कप्पा म्हणजे भारत व अरबी साहित्य पेक्षा जास्त मूल्यवान आहे असं कोणी म्हटलं होतं **– लॉर्ड मेकॉले**

39. 1862 मध्ये मुंबई विद्यापीठाची पहिली बी. ए. ची परीक्षा झाली त्यात पहिले चार पदवीधर कोण होते
**– न्या. रानडे, रामकृष्ण गोपाळ भंडारकर, बाबाजी आबाजी मोडक, बाबा गणेश वागळे**

40. इ. स. 1906 मध्ये समर्थ विद्यालय नावाची राष्ट्रीय शाळा कोल्हापुरात कोणी सुरू केली **– प्रो. विष्णू विजापूरकर**

41.सर चार्लस वूड खलित्याची अंमलबजावणी किती प्रमाणात झाली याची पाहणी करण्यासाठी लॉर्ड रिपन ने कोणते कमिशन नेमले होते **– हंटर कमिशन**

42. मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण कोणी सुरू केले **– बाळशास्त्री जांभेकर (1832)**

43. प्रभाकर, धूमकेतू, ज्ञानदर्शन या वृत्तपत्रांची सुरुवात कोणी केली **– भाऊ महाजन**

44.ज्ञानोदय' हे ख्रिश्चन मतांचा पुरस्कार करणारे पत्र होते. इ.स. 1842 मध्ये कोणी सुरू केले **– हेन्री बॅलंटाईन**

45.इ.स.1842 मध्ये आशिया खंडाचा व इ.स. 1851 मध्ये युरोपचा नकाशा कोणत्या पत्रात छापला होता **– ज्ञानोदय'**

46.24 जानेवारी 1874 ला निबंधमालेची सुरुवात कोणी केली **–विष्णुशास्त्री चिपळूणकर**

47.सामाजिक सुधारणेचा कट्टर पुरस्कार करणारे इंदुप्रकाश हे पत्र इ. स. 1862 मध्ये कोणी सुरू केले **– विष्णू परशुराम पंडित**

48.बातमीदार नेमण्याची प्रथा सुरू करणारे अरुणोदय हे पत्र इ. स.1866 मध्ये कोणी सुरू केले **– काशिनाथ विष्णू फडके**

49. हायकोर्टाचे निवाडे आपल्या पत्रात देणारे नेटिव्ह ओपिनियन इ . स. 1864 मध्ये कोणी सुरू केले **– विश्वनाथ नारायण मंडलिक**

50. कृष्णराव भालेकर यांनी पुण्यामधून जानेवारी 1877 रोजी कोणते पत्र सुरू केले **– दीनबंधू**

51. 'सत्य – सौख आणि ज्ञान' हे ब्रीद पाळणारे महाराष्ट्राचे पहिले दैनिक ज्ञानप्रकाश इ. स. 1849 मध्ये कोणी सुरू वेले
**– कृष्णाजी रानडे**

52. 4 मे 1873 ला सुरू झालेले प्रार्थना समाजाचे मुखपत्र कोणते होते **–सुबोध पत्रिका**

53. 1929 ला सुरू झालेले प्रगती या साप्ताहिकाचे संपादक कोण होते **– त्र्यंबक केशव शेजवळकर**

54. इ. स. 1887 मध्ये आगरकरांनी केसरीच्या संपादक पदाचा राजीनामा देऊन इ. स. 1888 मध्ये स्वतःचे कोणते पत्र चालू केले **– सुधारक**

55. ह. ना. आपटे यांनी 1890 च्या दशकातष्ठष्ठ. हे पत्र सुरू करून पण कोण लक्षात घेतो ही कादंबरी याच पत्रातून प्रसिद्ध केली **– करमणूक**

56. ख्रिश्चन मिशनऱ्यांचा कडवा प्रतिकार करणारे व पुण्यातून प्रकाशित होणारे विचारलहरी हे पत्र कोणी सुरू केले **– कृष्णशास्त्री चिपळूणकर**

57. देशातील वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणारा पहिला कायदा कोणता होता **– व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट**

58. ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराचे काम करणाऱ्या संस्थांना काय म्हणतात **– मिशनरी**

59. अमेरिकन मराठी मिशनची स्थापना कोणत्या वर्षी झाली **– इ. स. 1813**

60. महाराष्ट्रात ख्रिश्चन धर्म प्रसाराचे काम करणाऱ्या ख्रिश्चन संस्था कोणकोणत्या होत्या

**– चर्च मिशनरी सोसायटी, मुंबई बायबल सोसायटी, स्कॉटिश मिशनरी सोसायटी (1822, मुंबई), लंडन मिशनरी सोसायटी (1815, सुरत, बेळगाव), अमेरिकन मराठी मिशन संस्था (1813, मुंबई)**

61. 19 व्या शतकाच्या प्रारंभी मुंबई प्रांतात कोणत्याही ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला होता

**– विष्णू भास्कर करमरकर, रामकृष्ण विनायक मोडक, नारायण शेषाद्री, बाबा पद्मनजी, पंडिता रमाबाई, निळकंठ शास्त्री गोऱ्हे, कविवर्य नारायण वामन टिळक, गोविंदराव काणे, बाळा गोपाळ जोशी**

62. 19 व्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात देशांतून भारतात आलेले ख्रिश्चन धर्मोपदेशक कोणत्या पंथाचे होते **– प्रोटेस्टंट**

63. ख्रिश्चन मिशनमध्ये काम करणाऱ्या कोणत्या व्यक्तीने इ.स. 1801 मध्ये इंग्रजी मराठी गोष्ट तयार केला व इ. स. 1805 मध्ये मराठी भाषेची व्याकरण प्रसिद्ध केले **– डॉ. कॅरे**

64. इ. स. 1883 मध्ये येशू ख्रिस्ताचे चरित्र हे पुस्तक एकूण सात खंडात कोणी लिहिली **– बाबा पद्मनजी**

65. लॉर्ड डलहौसीच्या काळात कोणती रेल्वे मार्ग सुरू झाले

**– मुंबई ते ठाणे (1853), कलकत्ता ते रानीगंज (1855), मद्रास ते अर्कॉट**

66. लॉर्ड डलहौसीने Peeny Postage System सुरू वेली त्यानुसार अर्ध्या तोळ्यापेक्षा जास्त वजन असलेल्या कोणत्याही पत्रास पत्र पाठ पाठवणाऱ्याने किती रुपयाचे तिकीट लावावे असा नियम करण्यात आला **– अर्धा आणा**

67. रेल्वे मंडळाची स्थापना कोणत्या वर्षी झाली **– 1905**

68. कलकत्ता ते आग्रा ही तार सेवा कोणत्या वर्षी सुरु झाली **– 1853**

# 8. राजकीय संघटनांचा इतिहास

## बंगाल भागातील संघटना

- 1836 – वंगभाषा प्राचारिका सभा – राजा राममोहन रॉय, वंगभाषा विधान – रामचंद्र विद्याबगीश
- 1838 – लॅंडहोल्डर्स असोसिएॅशन – जमिनदारी संघटना
- देवेंद्रनाथ टागोर – अध्यक्ष सदस्य-प्रसन्नकुमार ठाकुर, राधाकांत देव
- इनाम कमिशन, 23000 इनाम जप्त केली.
- भारतातील पहिली राजकीय संघटना
- काही इंग्रज आणि काही भारतीय मिळुन
- 1839 – ब्रिटीश इंडिया सोसायटी
- विल्यम ॲडम
- लंडन येथे स्थापना झाली. (लॅण्डहोल्डर्सचे मुद्दे मांडण्यासाठी)
- 1843 – बंगाल ब्रिटीश इंडिया सोसायटी (बंगालमध्ये स्थापना)
- जॉर्ज थॉमसनने स्थापना केली.
- 1851 – ब्रिटीश इंडिया असोसिएशन (28 ऑक्टोंबर 1851)
- राधाकांत देव – अध्यक्ष यांनी कलकत्ता येथे स्थापना केली.
- लॅण्डहोल्डर्स आणि बंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी एकत्र येवून.
- देवेंद्रनाथ टागोर – पहिले चिटणीस
- सदस्य – राधाकांत देव, हरिशचंद्र मुखर्जी – हिंदु पेट्रीयाट – निलदर्पन – निळीच्या संदर्भात
- निलदर्पनचे भाषांतर : इंग्रजी – मधुसुदन दत्त, मराठी – मोरो विठ्ठल वाळवेकर, दिनबंधु मित्र
- 1833 च्या ॲक्टचे नुतनीकरण करुन 1853 नविन सनद येणार होती, त्यानुसार
- 11 डिसेंबर 1851 देवेंद्रनाथ टागोरांनी बंगाल प्रमाणेच मद्रास व मुंबई इल्याक्यातील शिष्टजनांना एकत्र येण्याचे आवाहन वेले.

## मुंबई मध्ये स्थापन झालेल्या संस्था

### बॉम्बे असोसिएशन :

- 26 ऑगस्ट 1852, पुर्णत: भारतीयांनी स्थापन केलेली पहिली राजकीय संघटना.
- मुंबई येथे नाना शंकरशेट, जमशेटजी जीजीभाई, दादाभाई नौरोजी यांनी स्थापन केली.
- पहिले अध्यक्ष – नाना शंकरशेट, पहिले सचिव – भाऊ दाजी लाड, विनायक शंकरशेट
- 'शेठीया असोसिएशन' हिंदी राजकारणाचा पाया घालण्याचे काम केले.
- भाऊ दाजी वैगेरेंनी पहिला सविस्तर विनंती अर्ज मुंबई, ठाणे, पुण्यातील 3000 प्रमुख नागरिकांच्या सह्या घेऊन 28 ऑक्टोबर 1852 ला हाऊस ऑफ कॉमन कडे पाठविण्यात आला होता.

**प्रमुख मागण्या :-**

1) नेटिव्ह सरकारी सेवेत भरणा करणे.
2) विद्यापीठ स्थापन करणे – उत्तर म्हणुन तीन विद्यापीठे स्थापन झाली – कलकत्ता, मद्रास, मुंबई
3) शिक्षणावरील खर्च वाढविणे.
4) स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करणे.

- कंपनीचे मुंबई इलाख्यातील न्यायप्रशासन व स्थानिक शासन मद्रासपेक्षाही निकृष्ट दर्जाचे असल्याचे भाऊ दाजींनी दाखवुन दिले होते.

- विरोध करणारे वृत्तपत्र – बॉम्बे गॅझेट

**बॉम्बे असोसिएशन प्रमुख मागणी :–**

- ठाण्यापर्यंत असलेला रेल्वेमार्ग कापुस पिकविणाऱ्या खानदेश आणि वऱ्हाड प्रांतापर्यंत घेऊन या .
- भारतीय न्यायाधीश नेमावे – ईलर्बट बिलाला विरोध करणाऱ्यांना विरोध
- सोन्याची नाणी पुन्हा चलनात आणावी.

## इतर

- भारत व इंग्लंडमधील व्यापार वाढीसाठी असोशिएशनचे तीन सभासद दादाभाई नौरोजी, शेठ मंचरजी होरमसजी, व शेठ कर्सेठजी रस्तुमजी कामा यांना इंग्लंडला पाठवण्यात आले.
- 1859 – लायसन्स बिलाविरुध्द – नाना जगन्नाथ यांच्या नेतृत्वाखाली व्यापाऱ्यांनी व भाऊ दाजी लाड यांच्या नेतृत्वाखाली – व्यावसायिकांनी वेगवेगळे अर्ज सादर केले.

### शेठीया गट – राजापेक्षा राजनिष्ठ गट :

- दरम्यान 1857 उठाव – नाना शंकरशेठ यांनी पैसे पुरवले असा आरोप केला. त्यासाठी उठावात संबंध आहे का हे पाहणारी समिती 'फोर्जेट समिती'
- मुंबईतील शेटीया मंडळी असोसिएशनचा मुखवटा भुषवित तर विद्यावंत वर्ग – वकील, पत्रकार पडद्यामागुन सुत्रे चालवीत.
- रास्त गोफ्तार, नेटीव ओपिनिअन–वृत्तपत्रे लाचार मुर्खपणा असा आरोप शेठजी वर्गावर करीत.
- असोसिएशनच्या अर्जांना प्रतिसाद म्हणुन ब्रिटीशांनी 'फॉसेट कमिशन ऑन इंडियन फायनान्स' नेमले. – नौरोजी फर्दुनजी यांनी साक्ष दिली.
- 1874 मध्ये भाऊ दाजी लाड यांचे निधन झाले आणि ही संख्या निष्क्रीय झाली. मे. 1879 मध्ये तिचा अंत झाला.
- शेठीया वर्गाचा प्रचंड प्रभाव आणि सरकार विरुध्द चळवळ करण्यास विरोध त्यांच्यातील विद्यावर्गाला केलेला विरोध.

### इंडियन रिफॉर्म सोसायटी :

- बॉम्बे असोसिएशनचे म्हणणे इंग्लंडमध्ये मांडण्यासाठी स्थापना.
- 13 मार्च 1853, इंग्लंड
- एडवर्ड रायॉन, अर्स्विन पेरी, जॉन ब्राईट इत्यादी. या संस्थेच्या प्रयत्नातुन भारत सरकारच्या घटनेत महत्वाचे बदल झाले.
- नागरी, मेडीकल सेवा मध्ये नेटिव्हांना नेमने शक्य झाले. यादरम्यान बॉम्बे असोसिएशन टिका करणारे प्रमुख वृत्तपत्र 'बॉम्बे गॅझेट' याने काम केले.– पायोनियर

### बॉम्बे प्रेसिडेंसी असोसिएशन :

- यांच्या सहाय्याने पहिले INC अधिवेशन भरले.
- फिरोजशहा, तेलंग, तय्यबजी – 31 जानेवारी 1885 'बॉम्बे प्रेसिडेंसी असोसिएशन' ही नविन राजकीय संघटना मुंबईत स्थापन केली.
- पुणे सार्वजनिक सभेसारखी क्रियाशील संस्था मुंबई मध्ये स्थापन करण्याचे प्रयत्न.
- बेहरामजी मलबारी यांच्या 'संमतिवय' विधेयकाला विरोध – वि.एन. मंडिलक सनातनी लोकांना पाठीशी घातले होते म्हणून तेलंग, रानडे – नाराज होते.
- मंडलिकांसह अनेक जुने – नवे सहकारी मिळवले त्यात जमशेटजी जिजीभाई, मंगलदास नथुभाई, दिनशा वाच्छा इत्यादी. समावेश.
- देशात गाजत असलेली इल्बर्ट बिलाविरुध्द (बिहारी लाल गुप्ता) मोहीम व लॉर्ड लिटन – प्रतिगामी भुमिकेविरुध्दची लाट यातुन ही संघटना निर्माण झाली होती.
- 'खरीखुरी राष्ट्रीय संघटना' उभारणे–मुलभुत हेतु
- भारतीयांचे राष्ट्रीय हक्क साध्य करणे, स्थानिक संस्थांना स्वातंत्र्य मिळवणे, लोकमत जागृत करणे. इत्यादी उद्दिष्टे

- के.टी तेलंग (1889) व बद्रुदीन (1895) हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणुन नेमणुक.
- 1888 मुंबई महानगरपालिका अधिनियम पास करुन घेतला – फिरोजशहा मेहता. त्यांना 'लॉयन ऑफ बॉम्बे', 'अनक्रॉउंड किंग ऑफ बॉम्बे' किताब लाभले.
- 1887 ते 1893 मुंबई कायदेमंडळाचे व 1894 ते 1899 केंद्रीय कायदेमंडळाचे सदस्य होते.
- काँग्रेसचे अध्यक्ष, अधिवेशन स्थळे त्यांच्याच संमतीने ठरवली जात.
- 1915 मध्ये निधन
- बॉम्बे प्रेसिडेंसी असोसिएशन पुढारी काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष बनले.
  1) दादाभाई नौरोजी 1886 – कलकत्ता, 1893 – लाहोर, 1906 – कलकत्ता
  2) बद्रुद्दीन तय्यबजी – 1887 – मद्रास
  3) फिरोजशहा मेहता – 1890 कलकत्ता
  4) रहिमतुल्ला सयानी – 1896 – कलकत्ता
  5) नारायणराव चंदावरकर – 1900 लाहोर
  6) दिनशा वाच्छा – 1901 – कलकत्ता
  7) गोपाळ कृष्ण गोखले – 1905 –बनारस

## पुण्यामध्ये स्थापन झालेल्या सभा

### सार्वजनिक सभा :

- सुरुवातीला नाव पुना असोशिएशन – पुणे सार्वजनिक सभा
- ब्रिदवाक्य – आस्ते कदम आगे बढो!
- पार्वती संस्थान मधील गैरव्यवहार आणि मनमानी कारभार याला कंटाळुन वकिल गणेश वासुदेव जोशी यांनी स्थापना.
- महादेव गोविंद रानडे, सिताराम चिपळुणकर, शिवराम साठे – सरकारी सेवक – प्रमुख सुत्रधार
- 1896 – टिळकांनी हस्तगत केली.
- सदस्य होण्यास 50 लोकांचा सहीनीशी पाठिंबा
- 2/3 कोकणस्थ ब्राम्हण – चित्तपावनांचा दबाव गट कार्यरत होता.
- भट – ब्राम्हणांची सभा – महात्मा फुले, एकमेव बहुजन व्यक्ती – गंगाराम भाऊ मस्के
- एकमेव महिला अध्यक्ष – मीरा पावगी
- लोकांना राजकिय शिक्षण देणे हे महत्वाचे कार्य केले.

### सार्वजनिक सभेची सामाजिक कार्ये

- शहरांप्रमाणेच खेड्यांमध्येही जनतेला हक्कांची जाणीव करुन देणे, दारु बंद करा, रेल्वे प्रवासी मागणीकडे लक्ष द्या. मीठाच्या कराविषयी जनमत संघटित करण्याचा प्रयत्न.
- खानदेश – गिरणा, पांझरा– पुरग्रस्त लोकांना 3000 रु. मदत पाठवली.
- 1875 मॉरिशसमध्ये हिंदी बांधवावर झालेल्या अन्यायाला प्रतिकारासाठी वर्गणी जमवुन पाठवली.
- सभेचे सर्वोपयोगी कार्य पाहुन इंदोरच्या होळकर महाराजांनी 4000 रु. मदत केली.
- 1875 पुणे, सातारा, अहमदनगर, सोलापुर सावकाराविरुध्द बंड, 'दख्खन दंगे' सभेने दंग्याची पाहणी करुन निवेदने दिली व जबाबदारी सरकारवर टाकली. उपाय म्हणुन शेतकऱ्यांना कर्ज द्या, शेती शिक्षण द्या. इत्यादी. शेतकऱ्यांतर्फे चळवळ उभा करण्याचे काम भारतात पहिल्यांदा सार्वजनिक सभेने केले.
- यश येवुन'डेक्कन–ॲग्रीकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट' लागु झाला. (1879)
- 1876 दुष्काळात प्रमुख भुमिका बजावली.

- रंजलेल्या शेतकऱ्यांना 17000 रु मदत पाठवली.
- सा.काकांनी बंगाल, गुजरात, मद्रास मधुन मदत मिळवली.
- देशीसोबत इंग्लंडमधील वृत्तपत्रांतुन प्रश्न मांडले.
- प्रभावी उपाय म्हणुन  फॅमिन कमिटी' नेमण्याचा आग्रह
- 'केर्ड' यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली त्यापुढे काकांनी साक्ष दिली.
- दुष्काळग्रस्तांना कामे द्या, स्वस्त दराने धान्य पुरवा, स्वस्त अन्नधान्य दुकाने काढा.
- दौंड – मनमाड रेल्वेला गती द्या– सकारात्मक प्रतिसाद
- 1877 लॉर्ड लिटनने दिल्ली दरबारमध्ये राणीला मानपत्र देण्याचा कार्यक्रम केला. नेतृत्व – काका व 10 लोक
- हिंदुस्तानच्या राजकीय महत्वकांक्षा, आकांक्षा ची मागणी यात करण्यात आली. मानपत्राला 'राजकीय महत्वकांक्षांचा जाहीरनामा' (Declaration of Rights) असे म्हणतात.
- हिंदी लोकांना ब्रिटीश राष्ट्राच्या बरोबरीने राजकीय, सामाजिक दर्जा प्राप्त करुन दया व स्वावलंबी बनवा.
- या अधिवेशनासाठी काकांनी खादीचा वेश परिधान केला होता.
- व्हर्नाकुलर ॲक्ट (लिटन) – कायद्यावर काकांनी टिका केली.
- काकांची पत्नी सरस्वतीबाई आणि मित्र सदाशिवराव गोवंडे यांच्या पत्नी सरस्वतीबाई दोघींनी मिळुन 'स्त्री विचारवती सभा' स्थापन केली.
- स्वदेशीचा प्रसार, घरीच मेणबत्ती, काडेपेटी, छत्र्या इत्यादी. वस्तु तयार करण्याचा कारखाना काढला
- दुष्काळ संहितेचे मराठी भाषांतर करुन टिळकांनी 6000 प्रति वाटल्या.( खंडबंदीची चळवळ)
- काकांचे निधन (25 जुलै 1880)
- मवाळ – डेक्कन सभा (मुळचे सभेतील कार्यकर्ते) डेक्कन सभा अध्यक्ष – न्या रानडे, उपाध्यक्ष – गोपाळवृष्ण गोखले.
- टिळकांनी सभेच्या माध्यमातुन 1896 – खंडबंदी चळवळ सुरु केली– अच्युतराव साठे प्रमुख.
- 1897 मध्ये ब्रिटीशांनी सभा मान्यता काढुन घेतली.
- डेक्कन सभा स्थापनेनंतर टिळकांनी – केसरीमध्ये 'हे म्हातारचळ की पोरखेळ' लेख लिहला.

## इतर महत्वाचे

- कायद्याचे मसुदे देशी भाषेत प्रसिध्द करावेत अशी सरकारकडे मागणी केली.
- हायकोर्टात हिंदी जज सभेला जावा यासाठी प्रयत्न केले, म्हणुनच न्या. नानाभाई हरिदास यांची मुंबई हायकोर्टाचे पहिले हिंदी न्यायाधीश म्हणुन नेमणुक केली.

## दीनबंधु सार्वजनिक सभा

- न्या. रानडेंच्या मार्गदर्शनाखाली पुण्यात काम करणारी सार्वजनिक सभा ही शेतकरी व विद्येत मागासलेल्या लोकांस काही उपयोगी नाही म्हणुन या सभेची स्थापना.

**सभेचा उद्देश :**

1. आमच्या अज्ञान शेतकरी व कारागीर लोकांची दु:खे सरकारास कळवुन दाद मागणे
2. आमच्या लोकांतील वाईट चाली वगैरे काढुन टाकण्याचा प्रयत्न करणे
3. आमच्या लोकांत ज्ञानाची वृध्दी करणे.

- सभेचे मुखपत्र : दीनमित्र
- सभेने केलेली कामे :

1. 1884–85 पासुन या सभेने सक्तीचे व मोफत शिक्षण मिळावे या मागणीसाठी सभा घेतल्या, अर्ज धाडले.

2. सभेचा नियम : या सभेमध्ये धर्मासंबंधी मुळीच वाद करायचा नाही; कारण धर्मसंबंध घेतला म्हणजे लोकांत मतभेद पडुन उगाचच वाद वाढतो.

### लंडनमध्ये स्थापन झालेल्या राजकीय संघटना

- **लंडन इंडियन सोसायटी :**
- लंडन या इंग्लंडच्या राजधानीत वास्तव्य करून असलेले दादाभाई नौरोजी हे या संस्थेचे अध्यक्ष होते तर व्योमेशचंद्र बॅनर्जी हे या संस्थेचे सचिव होते. तिची स्थापना 1865 मध्ये झाली.
- **ईस्ट इंडिया असोसिएशन :**
- उद्देश–भारतीयांना राजकीय शिक्षण देणे.
- काही निवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या सहकार्याने लंडन इंडियन सोसायटीच्या काही सदस्यांनी ही नवी राजकीय संस्था 1866 मध्ये स्थापन केली. ही संस्था लवकरच विशेषतः ब्रिटिशांमध्ये लोकप्रिय झाली. 1869 मध्ये भारतात मुंबई, कलकत्ता व मद्रास येथे या संघटनेच्या शाखा स्थापन झाल्या. पुढे ब्रिटिशांची सहानुभूती कमी झाली आणि साहजिकच या संस्थेचा प्रभावही ओसरला.
- **नॅशनल इंडियन असोसिएशन :**
- मेरी कार्पेटर या ब्रिटिश महिलेने ही संस्था 1867 मध्ये स्थापन केली. भारतातील वेगवेगळ्या भागात तिच्या शाखा प्रस्थापित झाल्या. पण ही संस्था फारशी पुढे आली नाही.
- **इंडियन सोसायटी :**
- थोड्या कालावधीसाठी केंब्रिज विद्यापीठात शिकत असताना आनंदमोहन बोस यांनी या संस्थेची 1872 स्थापना मध्ये केली. इंग्लंडमध्ये राहणाऱ्या भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना जागविणे हा या संघटनेचा हेतू होता.

### डेक्कन सभा (1896)

- अध्यक्ष – महादेव गोविंद रानडे, उपाध्यक्ष – गोपाळकृष्ण गोखले

### उदारमतवादी पक्ष (1919) (Libral Party)

- सुरेंद्रनाथ बॅनर्जी, 1895 – पुणे कॉंग्रेस अधिवेशन – सुरेंद्रनाथ बॅनर्जी, साऊथ बरो कमिशनमध्ये भारतीय सदस्य

### लोकशाही स्वराज पक्ष (1920)

- लोकमान्य टिळक

### राष्ट्रीय संघटना

| अ. क्र | संघटनेचे नाव | स्थापना | स्थळ | संस्थापक, संबंधित व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| 1. | बंगभाषा प्रकाशिका सभा | 1836 | बंगाल | राजा राममोहन रॉय |
| 2. | लॅण्डहोल्डर्स सोसायटी | जुलै 1838 | कलकत्ता | द्वारकानाथ टागोर, प्रसन्नकुमार टागोर |
| 3. | ब्रिटीश इंडिया असोसिएशन (जमीनदार संघटनेसोबत सहकार्य) | 1839 | लंडन | विल्यम अॅडम |
| 4. | बंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी | 1843 | कलकत्ता | जॉर्ज थॉमस |
| 5. | ब्रिटिश इंडिया असोसिएशन | 28 ऑक्टोबर 1851 | बंगाल | देवेंद्रनाथ टागोर, राधाकांत देव |

| अ. क्र | संघटनेचे नाव | स्थापना | स्थळ | संस्थापक, संबंधित व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| 6. | डेक्कन असोसिएशन | जानेवारी 1852 | पुणे | सरदार रास्ते, पुरंदरे, सरदार बीनीवाले |
| 7. | बॉम्बे असोसिएशन | ऑगस्ट . 1852 | मुंबई | जगन्नाथ शंकरशेट, दादाभाई, जमशेठजी, भाऊ दाजी (सचिव) |
| 8. | ईस्ट इंडिया असोसिएशन | 1866 | लंडन | दादाभाई नौरोजी, डब्ल्यु.सी. बॅनर्जी |
| 9. | पूना असोसिएशन | 1867 | पुणे | ग.वा.जोशी |
| 10. | पुणे सार्वजनिक सभा | 1870 | पुणे | म.गो.रानडे, ग.वा.जोशी |
| 11. | इंडियन लीग | सप्टेंबर 1875 | कोलकत्ता | शिशिरकुमार घोष (अमृतबाजार पत्रिका) |
| 12. | इंडियन असोसिएशन | 26 जुलै 1876 | कोलकत्ता | सुरेंद्रनाथ बॅनर्जी, आनंदमोहन बोस |
| 13. | मद्रास महाजन सभा | 1884 | मद्रास | रंगय्या नायडु, सुब्बराव पंतलु, एम वीरराघवाचार्य, सुब्रम्हण्यम अय्यर |
| 14. | बॉम्बे प्रेसिडेनसी असोसिएशन | 1885 | मुंबई | मेहता, तेलंग, तय्यबजी (Brother -in -'Law') |
| 15. | अखिल भारतीय राष्ट्रीय परिषद | 1883 | कलकत्ता | सुरेंद्रनाथ बॅनर्जी |

**राजकिय संघटना**

| अ. क्र | संघटनेचे नाव | स्थापना | संस्थापक, संबंधित व्यक्ती |
|---|---|---|---|
| 1. | मद्रास असोशिएशन | 1852 | – |
| 2. | मद्रास ईस्ट इंडिया असोशिएशन | 1869 | – |
| 3. | मद्रास महाजन सभा | 1884 | सुब्बाराम पंतलु, विरराघवाचार्य, आनंद चारलु, रंगय्या नायडु |
| 4. | मद्रास लेबर युनियन | 1918 | बी.पी. वाडीया |
| 5. | नायर सेवक समाज | 1914 | केरळ–सुब्रमण्यम अय्यर |
| 6. | इंडियन मराठा लीग | 1920 | विठ्ठल रामजी शिंदे |
| 7. | भारत सेवक समाज | 1905 | गोपालकृष्ण गोखले |
| 8. | मुस्लीम लीग –ढाका | 1906 | आगाखान, नवाब सलीमुल्ला |
| 9. | सोशल सर्व्हीस लीग | 1911 | नारायण मल्हार जोशी |
| 10. | राष्ट्रीय उदारमतवादी संघ | 1918 | सुरेंद्रनाथ बॅनर्जी |
| 11. | काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी | 1920 | लोकमान्य टिळक |
| 12. | आयटक | 1920 | लाला लजपतराय |
| 13. | स्वराज्य पक्ष | 1923 | मोतीलाल नेहरु, चित्तरंजन दास |
| 14. | राष्ट्रीय स्वयंसेवक संघ | 1925 | केशव हेडगेवार |
| 15. | नवजवान भारत सभा | 1926 | भगतसिंह व अजितसिंह |
| 16. | प्रतियोगी सहकारीता | 1926 | न.चिं केळकर |

| अ. क्र | संघटनेचे नाव | स्थापना | संस्थापक, संबंधित व्यक्ती |
|---|---|---|---|
| 17. | खुदाई–खिदमतगार | 1929 | खान अब्दुल गफारखान |
| 18. | काँग्रेस समाजवादी पक्ष | 1934 | जयप्रकाश नारायण |
| 19. | दिनबंधु सार्वजनिक सभा | 1884 | कृष्णराव भालेकर |
| 20. | डेक्कन रयत समाज | 1918 | अण्णासाहेब लठ्ठे |
| 21. | इंडियन रिपब्लीकन असोशिएशन | 1920 | सचिंद्रनाथ सेन |
| 22. | अखिल भारतीय किसान सभा | 1936 | एन.जी.रंगा, सहजानंद, सर छोटुराम |
| 23. | फॉरवर्ड ब्लॉक | 1939 | सुभाषचंद्र बोस |
| 24. | INTUC | 1947 | सरदार वल्लभभाई पटेल |
| 25. | वुमेन्स इंडिया असोशिएशन | 1927 | लेडी सदाशिव अय्यर |
| 26. | फ्री इंडिया सोसायटी | 1906 | लंडन – वि.दा.सावरकर |
| 27. | भारतीय विद्या भवन | 1939 | के.एम.मुन्शी |
| 28. | लोकसभा | 1886 | र.न.मुधोळकर |
| 29. | मुस्लीम शिक्षण परिषद | 1886 | सर सय्यद अहमद खान |
| 30. | वफादार समुदाय | 1888 | सर सय्यद अहमद खान |
| 31. | उत्तर भारतीय मुस्लीम लीग सुरक्षा | 1893 | सर सय्यद अहमद खान |
| 32. | ब्राम्हणेत्तर पक्ष | 1920 | केशवराव जेधे |

## होमरुल लीग

- वसाहतींअंतर्गत स्वराज्याची मागणी केली.
- आम्हाला देव हवेत परंतू पुजारी नकोत आमच्यापैकी पुजारी नेमा – टिळक
- इंडियन होमरुल सोसायटी 1905 – श्यामजी कृष्ण वर्मा

| लोकमान्य टिळक यांची होमरुल लीग | ॲनी बेझंट यांची होमरुल लीग |
|---|---|
| एप्रिल 1916 | सप्टेंबर 1916 |
| मुंबई वगळता वऱ्हाडमध्ये महाराष्ट्र कर्नाटक | मुंबई, मद्रास, इतर भारत |
| जोसेफ बॅप्टीस्टा – अध्यक्ष, न.चि.वेळकर – सचिव | अध्यक्ष – ॲनी बेझंट सचिव – जॉर्ज अरुंडेल |